ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २०९ वा ❑ भारतीय सौर दिनांक १७ आश्विन शके १९४८, शुक्रवार दि.०९ ऑक्टोंबर २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)

पडद्यावरचा क्रांतिवीर आणि शेतकऱ्यांचा महानायक हरपला

ज्योतिर्मय साहित्य

क्रांतिवीर चित्रपटात भूमिका साकारणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले आहे. ते गोव्यातील डोना पौला येथील त्यांच्या निवासस्थानी बेशुद्ध अवस्थेत आढळले आणि त्यांना तातडीने एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्यांना तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने मृत घोषित केले.

आपल्या दमदार आवाजासाठी, स्पष्टवक्तेपणासाठी आणि प्रभावी संवादफेकीसाठी ओळखल्या जाणाऱ्या नाना पाटेकर यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीतील एका गौरवशाली युगाचा अंत झाला आहे.

नाना पाटेकर हे भारतीय चित्रपटसृष्टीतील एक दिग्गज आणि अष्टपैलू अभिनेते असण्यासोबतच एक संवेदनशील समाजसेवक म्हणूनही त्यांची ओळख होती. पाटेकर रुपेरी पडद्यावर आपल्या खणखणीत संवादांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवणाऱ्या नानांनी खऱ्या आयुष्यात मात्र अत्यंत साधेपणा जपला होता, समाजातील गरजूंच्या मदतीसाठी स्वतःला वाहून घेतले होते. त्यांचा चित्रपट कलाकारापासून ते एक आदरणीय समाजसेवक बनण्यापर्यंतचा प्रवास थक्क करणारा आहे.

नाना पाटेकर यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीला अनेक अजरामर चित्रपट आणि व्यक्तिमत्त्वे दिली आहेत. त्यांच्या अभिनयाची एक वेगळी आणि आक्रमक शैली होती. त्यांनी क्रांतिवीर, तिरंगा, यशवंत, अग्निसाक्षी, परिंदा, वेलकम आणि मराठीतील नटसम्राट यांसारख्या अनेक चित्रपटांमध्ये उत्कृष्ट भूमिका साकारल्या. त्यांचे कडक संवाद आणि अभिनय शैली आजही प्रेक्षकांच्या मनावर राज्य करतात. त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि पद्मश्री पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले होते.

चित्रपटसृष्टीत नाना पाटेकर यांनी अशा भूमिका साकारल्या ज्यांनी प्रेक्षकांना अंतर्मुख केलं आणि व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवण्याची प्रेरणा दिली १९९४ मधील क्रांतिवीर चित्रपटातील त्यांची प्रताप नारायण टिळक ही भूमिका त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. समाजातील भ्रष्टाचार आणि अन्यायाविरुद्ध त्यांनी फोडलेला टाहो आणि दिलेले खणखणीत संवाद आजही लोकांच्या अंगावर काटा आणतात.

परिंदा मधील खलनायक अण्णा, तिरंगा मधील कडक पोलीस अधिकारी शिवाजीराव वागळे, ते नटसम्राट मधील गणपतराव बेलवलकर अशा एकापेक्षा एक आव्हानात्मक भूमिका त्यांनी लीलया पेलल्या. त्यांचे पॉझेस (थांबे), आवाजातील चढ-उतार आणि चेहऱ्यावरील हावभाव ही त्यांची सर्वात मोठी ताकद होती ज्याने हिंदी आणि मराठी सिनेसृष्टीला एक नवा चेहरा दिला.

समाज सेवक म्हणून प्रवास


चित्रपटांतून अमाप प्रसिद्धी मिळवूनही नाना पाटेकर यांनी आपले पाय जमिनीवर ठेवले.त्यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची भीषण परिस्थिती पाहून त्यांचे मन हेलावले आणि त्यांनी प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली.त्यांनी नाम फाउंडेशनची स्थापना २०१५ केली.नाना पाटेकर आणि अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी २०१५ मध्ये नाम फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना थेट मदत केली जाते. आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांना धीर देण्यासाठी नानांनी स्वतः गावोगावी जाऊन शेकडो कुटुंबांना प्रत्येकी १५,००० रुपयांची आर्थिक मदत आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले.

नाम फाउंडेशन अंतर्गत अनेक गावांमधील नद्यांचे खोलीकरण, गाळ काढणे, विहिरी बांधणे आणि पाण्याचे स्त्रोत पुनरुज्जीवित करण्याचे मोठे काम करण्यात आले. यामुळे अनेक गावे पाण्यासाठी स्वावलंबी झाली आहेत.

नाना पाटेकर त्यांच्या चित्रपट आणि इतर उत्पन्नातील अंदाजे ९०% हिस्सा सामाजिक कार्यासाठी आणि गरिबांच्या कल्याणासाठी दान करत होते. करोडोंची संपत्ती आणि प्रचंड प्रसिद्धी असूनही नाना पाटेकर अत्यंत साधे जीवन होते आपल्या कमाईचा एक खूप मोठा हिस्सा ते प्रसिद्धीची हाव न धरता गुप्तपणे समाजकार्यासाठी दान करत होते.

नाना पाटेकर हे केवळ रुपेरी पडद्यावरील रील हिरो नव्हते तर, समाजाच्या कठीण काळात धावून जाणारे खऱ्या आयुष्यातील रिअल हिरो होते. कला आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुरेख संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होते. सिनेमात डायलॉग मारणे सोपे असते, पण प्रत्यक्ष मैदानात उतरून काम करणे कठीण असते,'' हे नाना पाटेकरांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले होते म्हणूनच महाराष्ट्रातील जनतेच्या हृदयात त्यांचे स्थान केवळ एक अभिनेता म्हणून नाही, तर एक लोकनायक म्हणून अजरामर राहतील.

नाना पाटेकर हे केवळ एक उत्तम अभिनेते नव्हते, तर ते समाजाप्रती असलेल्या कर्तव्याची जाणीव ठेवणारे एक खरे रिएल लाईफ हिरो होते. म्हणूनच त्यांना रील लाईफचे क्रांतिवीर आणि रिअल लाईफचे महानायक म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. अशा या क्रांतिवीर अभिनेत्याला भावपूर्ण श्रद्धांजली!!



कव्हरस्टोरी



सुधीर अग्रवाल, वर्धा
मो. 95615 94306

'एक दिवस शाळा पालकांच्या हाती', पालकांच्या सहभागातून विद्यार्थ्यांना कला-कौशल्यांची अनोखी शिकवण

ज्योतिर्मय साहित्य



ज्ञानसंवर्धिनी प्राथमिक शाळा, शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा या शाळेत पालकांचा शाळेतील सक्रिय सहभाग वाढविणे, त्यांच्या अंगी असलेल्या विविध कला-कौशल्यांची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे आणि शाळा-पालक संबंध अधिक दृढ करणे, या उद्देशाने 'एक दिवस शाळा पालकांच्या हाती' हा अभिनव उपक्रम उत्साहात राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत पालकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपल्या विविध कला, कौशल्ये व अनुभवांची प्रात्यक्षिके सादर केली. तसेच अभ्यास, शिस्त, चांगल्या सवयी, मोबाईलचा योग्य वापर, वेळेचे नियोजन व जबाबदारी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पालकांनी शाळेच्या दैनंदिन कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला, तर विद्यार्थ्यांना आपल्या पालकांच्या अनुभवातून व कौशल्यातून शिकण्याची अनोखी संधी मिळाली. पालक-शिक्षकांमधील संवाद, विश्वास आणि सहकार्य वाढवून विद्यार्थ्यांच्या सवयी व वर्तनात सकारात्मक बदल घडविणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

पालकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि विद्यार्थ्यांचा आनंदी प्रतिसाद यामुळे 'एक दिवस शाळा पालकांच्या हाती' हा उपक्रम संस्मरणीय ठरला.

१२ वे अंबाजोगाई साहित्य संमेलनाची जय्यत तयारी

ज्योतिर्मय साहित्य



छत्रपती संभाजीनगर - मराठवाडा साहित्य परिषद, शाखा अंबाजोगाईच्या वतीने १२ व १३ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे १२ वे अंबाजोगाई साहित्य संमेलन होणार आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक इंदुमती जोंधळे व स्वागताध्यक्ष शकुंतला लोमटे या आहेत. या दोन दिवसीय साहित्य संमेलनात भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

संमेलनात परिसंवाद, कथाकथन, काव्यवाचन, खुले कवी संमेलन, सांस्कृतिक कार्यक्रम, कथास्पर्धा, पुस्तक प्रदर्शन, पुस्तकांच्या मुखपृष्ठांचे अनोखे प्रदर्शन आदी विविध कार्यक्रम होणार आहेत. संमेलनाच्या निमिताने विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

दरम्यान, अंबाजोगाईच्या आठवणींची स्मरणिका प्रकाशित करण्यात येणार आहे. यासंदर्भात स्मरणिका उपक्रम समितीची बैठक दिनांक ४ ऑक्टोबर २०२६, रविवार रोजी स्वागताध्यक्ष शंकुतलाताई लोमटे यांच्या अध्यक्षतेखाली एम.आय.टी. संकुल, बीड बायपास, छत्रपती संभाजीनगर येथे झाली. प्रारंभी अंबाजोगाईच्या आठवणी असणारे लेख असणारी स्मरणिका उपक्रमाचे प्रमुख विलास इंगळे यांनी सभाध्यक्षांच्या परवानगीने उपस्थित सर्वांचे शब्द सुमनाने स्वागत करून बैठकीला सुरुवात केली.

दरम्यान, विलास इंगळे यांनी स्मरणिका उपक्रमास प्रतिसाद चांगला असून आतापर्यंत ३० लेख आले असल्याचे सांगून मुखपृष्ठ डिझाईन, वापरावयाचा कागद याबाबत काही मुद्रक, संपादक यांच्याशी चर्चा करणे चालू असल्याचे सांगीतले. तसेच अंबाजोगाईतील विविध चळवळी व दिवंगत मान्यवरांच्या आठवणी एकत्र करण्याचे नियोजन करण्यात आले.

स्वागताध्यक्ष शकुंतला लोमटे यावेळी म्हणाल्या की, कसल्याच प्रकारची वादावादी न होता खेळीमेळीच्या वातावरणात प्रत्येक बैठक होत असल्यामुळे संमेलन छानच होईल, याची खात्री आहे. बैठकीस स्वागताध्यक्ष शंकुतला लोमटे यांच्यासह मार्गदर्शक अमर हबीब, स्वागत समितीचे सचिव गोरख शेंद्रे, उपक्रम प्रमुख विलास इंगळे, डॉ. शिरीष खेडगीकर, ॲड. सुनील काळदाते, प्रभाकर आगळे, महावीर भगरे व अरुण थोरात उपस्थित होते. सचिव गोरख शेंद्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

वीज कंत्राटी कामगारांचे दिवाळीत बेमुदत कामबंद आंदोलन

ज्योतिर्मय साहित्य

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ संलग्न भारतीय मजदूर संघाची प्रदेश कार्यकारणी बैठक दि. ३ व ४ ऑक्टोबर रोजी पुणे येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. राज्यभरातून सुमारे ८० पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

बैठकी दरम्यान ज्येष्ठ मार्गदर्शक मा.आण्णाजी देसाई तसेच भारतीय मजदूर संघाचे संघटन मंत्री मा.बाळासाहेब भुजबळ व अर्जुन चव्हाण यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

क्रिस्टल व स्मार्ट एजन्सी सह राज्यातील सर्व वीज कंत्राटी कामगारांना दिवाळी पूर्वी बोनस, वेतन व फरकाची रक्कम मिळावी, जादा कामाचा मोबदला मिळावा, कामगार बदली धोरण रद्द करावे, कंत्राटदारांनी सूड भावनेतून कामगारांना एकतर्फी कमी करू नये, कोर्ट संरक्षित कमी केलेल्या कामगारांना पुन्हा कामावर घ्यावे व त्यांच्या याद्या संपर्क पोर्टल ला दाखवाव्यात कंत्राटदार बदलले तरी कामगार तेच रहावे व सेवाजेष्ठते कामगारांना रोजगार मिळावा, मेडिक्लेम सुविधा उपलब्ध करावी व अन्य अनेक मागण्यासाठी २७ ऑक्टोबर रोजी सर्व जिल्ह्यात व महावितरण चे मुख्यालय प्रकाशगड बांद्रा मुंबई येथे आंदोलन करण्याचा निर्धार सर्वानुमते झाला.

मागील काळात केवळ आश्वासने मिळाली आता ठोस कृती हवी अन्यथा दिवाळीमध्ये ६ नोव्हेंबर पासून कामबंद करण्याचा निर्धार केल्याचे कार्याध्यक्ष राहुल बोडके यांनी सांगितले.

मा.ऊर्जामंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी २०२४ साली स्पष्ट निर्देश दिल्यानंतर सुद्धा प्रशासनाकडून मुजोर कंत्राटदारांवर कारवाई होत नसल्याने जीवाची पर्वा न करता जनतेला वीज सेवा देणाऱ्या कामगारांवर प्रचंड आर्थिक व सामाजिक अन्याय होत आहे.

महाराष्ट्रात दुष्काळ पडला असून इकडे या कामगारांना अनेक महिने वेतन व मागील फरक नाही, प्रशासन केवळ आश्वासने देते मात्र पूर्ण करत नसल्याने दिवाळीत आंदोलना शिवाय पर्याय नसल्याचे संघटनेचे अध्यक्ष निलेश खरात म्हणाले.

या बैठकीस कार्याध्यक्ष राहुल बोडके, संघटनमंत्री उमेश आनेराव, कोषाध्यक्ष सागर पवार व उपमहामंत्री अमर लोहार यांची प्रमुख उपस्थिती होती.

दोन दिवसातील विविध सत्रांत संघटनेच्या आगामी वाटचालीबाबत मार्गदर्शन केले. नवीन कार्यकारणीला नियुक्तीपत्रे देण्यात आली. बैठकीचे आभार प्रदर्शन पुणे झोन सचिव मा. श्री. योगेश महागरे यांनी केले.






जात्यावरच्या ओव्या.....

माय माऊलीची माया
हिला जगी नही तोड
घरट्याच्या काडीसाठी
सुगरण करे धडपड ||८८१||

माय माऊलीची माया
पदराखाली आभाळ
पाखरांच्या पंखामंधी
हिन बांधलय बळ ||८८२||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७८



ज्योतिर्मय साहित्य

अहो ज्या नरा रामविश्वास नाही ।
तया पामरा बाधिजे सर्व काही ।
महाराज तो स्वामी कैवल्यदाता ।
वृथा वाहने देहेसंसारचिंता ।।७८।।

अर्थ : ज्या मनुष्याचा परमेश्वरावर विश्वास नाही, त्या माणसाला (पामराला) सर्व प्रकारची संकटे त्रास देतात. भगवंत महाराज म्हणजे राजांचा राजा आहे, या विश्वाचा स्वामी म्हणजे मालक आहे, तो कैवल्यदाता म्हणजे मोक्ष देणारा आहे. असा हा सर्वशक्तिमान परमेश्वर आपली काळजी वाहण्यास समर्थ असताना आपण उगाच देहाची आणि संसाराची चिंता करीत बसतो.


(पामर - क्षुद्र / हीन /दीन /दुबळा, बाधणे - त्रास होणे, कैवल्यदाता - मोक्ष देणारा, वृथा - व्यर्थ)




विवेचन : आधीच्या श्लोकात समर्थांनी श्रीरामावर निष्काम श्रद्धा ठेवून त्याचे नामस्मरण केल्यास मनातील द्वंद्व नाहीसे होते. सर्व जीवांच्या मध्ये तो एकच परमात्मा व्यापून राहिला आहे असा साक्षात्कार होतो असे सांगितले आहे. या श्लोकात ज्याचा रामावर विश्वास नाही अशा माणसाचा खरपूस समाचार समर्थ घेतात. अशा माणसाला ते पामर म्हणतात. पामर म्हणजे क्षुद्र, हीन. गरीब आणि पामर यात फरक करता येतो. गरीब माणूस आपल्या कर्तृत्वाने स्वतःची उन्नती करून घेऊ शकतो. परंतु हा त्या दृष्टीने महामूर्खच म्हणावा लागेल. कारण आपले हित कशात आहे हे त्याला कळत नाही. ज्यांची परमेश्वरावर श्रद्धा नाही, अशा माणसांना समर्थ पामर म्हणतात. मग तो ऐहिक दृष्ट्या भलेही श्रीमंत असेल, पण पारमार्थिक दृष्ट्या अभागी आणि हीन दीन.

असा माणूस आर्थिक दृष्ट्या भलेही सधन असेल पण प्रपंचात येणाऱ्या संकटांनी तो खचून जातो. प्रपंचातील संकटांचे तडाखे भल्याभल्यांना सोसवत नाहीत. छोट्यामोठ्या गोष्टींनीही अशी माणसे विचलित होतात. समर्थांच्या शब्दात सांगायचे तर अशा माणसांना संसार आणि त्यातील अडचणी बाधक ठरतात. पण ज्यांची रामावर श्रद्धा आहे, अशा माणसांना प्रपंचातील संकटे विचलित करीत नाहीत. त्यांना संकटे येत नाहीत असे नाही. पण भगवंतावर सर्व भार टाकल्यामुळे त्यांना अशा गोष्टींचा त्रास होत नाही.

(क्रमशः)





नाम-रूपाचा संबंध !


श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नाम घेत असताना रूपाचे ध्यान आवश्यक आहे का ? वास्तविक, नाम आणि रूप ही भिन्न नाहीतच. पण नाम हे रूपाच्या आधीही असते आणि नंतरही उरते. नाम रूपाला व्यापून असते. राम जन्माला येण्यापूर्वी वाल्मीकींनी रामायण लिहिले, आणि रामाने मागाहून जन्म घेऊन त्यात वर्णन केल्याप्रमाणे आचरण करून दाखविले. म्हणजे रूप अस्तित्वात येण्यापूर्वी नाम होते, आणि रूप गेल्यानंतर आजही नाम शिल्लक आहे. देशकालाच्या पलीकडे जे कायम टिकते ते सत्य होय. प्रत्यक्ष आकाराला आलेली अनेक रूपे नाहीशी झाली तरी त्यांचे नाव टिकून राहते. म्हणजे नाम हे देशकालाच्या मर्यादेच्या पलीकडे असते; म्हणजे ते रूपापेक्षा जास्त सत्य असते. जे सत्य आहे ते श्रेष्ठ असलेच पाहिजे. तेव्हा नाम घेणे ही गोष्ट मुख्य आहे. ते घेत असताना रूपाचेही ध्यान राहिले तर उत्तमच; पण ते तसे न राहिले, तरी नाम घेत असताना रूपाचे स्मरण सूक्ष्मरूपाने असतेच असते. समजा, एका गृहस्थाच्या घरी राम नावाचा गडी आहे. तो गृहस्थ ' राम राम ' असा जप करीत बसला आहे, पण त्याचे लक्ष राम-रूपाकडे नाही, मनात काहीतरी दुसरेच विचार चालू आहेत. अशा वेळी त्याला जर एकदम विचारले की, ' तुम्ही कुणाचे नाव घेत आहात ? ' तर अर्थात् 'रामाचे', असेच उत्तर तो देईल. हे उत्तर देताना त्याच्या मनात ' दाशरथी राम ' हीच व्यक्ती असणार, ' राम गडी ' ही व्यक्ती नसणार. याचाच अर्थ असा की, नाम घेत असताना रूपाचे ध्यान सूक्ष्मरूपाने आत जागृत असते. म्हणूनच, रूप ध्यानी येत नाही म्हणून अडून बसू नये. नामस्मरण करण्याचा अट्टाहास ठेवावा, त्यात सर्व काही येते.

एखाद्या माणसाची आणि आपली ओळख असेल तर पहिल्याने त्याचे रूप पुढे येते आणि नंतर नाम येते. पण आपली त्याची ओळख नसेल, आणि आपण त्याला बघितलेला नसेल, तर त्याचे फक्त नाव येते. आज आपल्याला भगवंताची ओळख नाही, म्हणून त्याचे रूप माहिती नाही; परंतु आपल्याला त्याचे नाम घेता येईल. सध्यासुद्धा, त्याचे नाम घेताना त्याची आठवण आपल्याला होते हा आपला अनुभव आहेच. भगवंताचे रूप तरी निश्चीत कुठे आहे ? एक राम ' काळा ' तर एक राम ' गोरा ' असतो; एक राम 'लहान' तर एक ' मोठा ' असतो; पण सर्व रूपे एका रामाचीच असतात. भगवंत स्वत: अरूप आहे; म्हणून जे रूप आपण त्याला द्यावे तेच त्याचे रूप असते. यासाठी आपण कोणत्याही रूपामध्ये त्याचे ध्यान केले तरी चालते. नामातून अनंत रूपे उत्पन्न होतात आणि अखेर त्यामध्येच ती लीन होतात. म्हणून भगवंताचे नाम श्रेष्ठ आहे. हे त्याचे नाम तुम्ही आवडीने, अखंड घ्या आणि आनंदात रहा. दानात दान अन्नदान, उपासनेत उपासना सगुणाची उपासना, आणि साधनात साधन नामस्मरण.









टोमॅटो सुप आश्चर्यकारक फायदे....

ज्योतिर्मय साहित्य

१) हाडांसाठी फायदेशीर आहे...

टोमॅटोच्या सूपमध्ये व्हिटॅमिन के आणि कॅल्शियम असते ज्यामुळे हाडे मजबूत राहतात. याशिवाय शरीरात लाइकोपीनच्या कमतरतेमुळे हाडांवर ताण येतो आणि टोमॅटोमध्ये भरपूर लायकोपीन असते, जे हाडांसाठी चांगले असते.

२) मेंदू निरोगी ठेवते... टोमॅटोच्या सूपमध्ये कॉपर आणि पोटॅशियम मुबलक प्रमाणात आढळते, ज्यामुळे मज्जासंस्था निरोगी राहते आणि मेंदू मजबूत होतो.

टोमॅटो सूपमध्ये व्हिटॅमिन ए आणि सी चांगल्या प्रमाणात असते. ऊतींच्या विकासासाठी व्हिटॅमिन ए आवश्यक आहे. असे म्हटले जाते की शरीराला दररोज १६% व्हिटॅमिन ए आणि २०% व्हिटॅमिन सी आवश्यक असते आणि टोमॅटो सूप त्याची आवश्यकता पूर्ण करते.

४) वजन कमी करते...

टोमॅटोचे सूप ऑलिव्ह ऑईलने बनवल्यास वजन कमी करण्यास मदत होते, कारण त्यात जास्त प्रमाणात पाणी आणि फायबर असते, ज्यामुळे तुम्हाला जास्त वेळ भूक लागत नाही.



५) कॅन्सरचा धोका कमी करते...

टोमॅटोच्या सूपमध्ये लाइकोपीन आणि कॅरोटीनॉइड सारखे अँटी-ऑक्सिडेंट असतात, ज्यामुळे कॅन्सरचा धोका कमी होतो.

६) रक्तातील साखरेवर नियंत्रण ठेवले जाते... मधुमेहाच्या रुग्णांनी आहारात टोमॅटोचे सूप अवश्य घ्यावे. यामध्ये क्रोमियम असते, जे रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यास मदत करते.

७) रक्त प्रवाह वाढवते...

टोमॅटोमध्ये सेलेनियम असते, ज्यामुळे रक्त प्रवाह वाढतो, ज्यामुळे अनिमियाचा धोका कमी होतो.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

***

त्याग, उत्कट भाव.....दोन ध्रुव

ज्योतिर्मय साहित्य

''मी तुझ्याशिवाय जगू शकत नाही'' हे वाक्य प्रेमात अनेकदा ऐकायला मिळते. या वाक्यात भावना आहेत, आपुलकी आहे, एकमेकांविषयीची ओढ आहे. परंतु प्रेमाची खरी कसोटी केवळ एकत्र असण्यात नसते; ती एकमेकांच्या अनुपस्थितीतही नात्याशी प्रामाणिक राहण्यात असते.

पती-पत्नी एकमेकांना आयुष्यभर साथ देण्याची वचने देतात. सुख-दुःखात एकत्र राहण्याचे आश्वासन देतात. परंतु जीवन हे नेहमी आपल्या इच्छेनुसार घडत नाही. काळाच्या प्रवाहात कधी परिस्थिती बदलते, कधी अंतर निर्माण होते, तर कधी नियती एखाद्याला अचानक दूर घेऊन जाते. अशा वेळी प्रेम संपत नाही; उलट ते अधिक गहिरे आणि व्यापक रूप धारण करते.

माझ्या मते, खरे प्रेम म्हणजे ''तू माझ्यासोबत असलास तर मी आनंदाने जगीन'' एवढेच नव्हे, तर ''तू माझ्यासोबत नसशील तरी तुझ्या आठवणी, तुझे संस्कार आणि तुझ्या स्वप्नांची पूर्तता करत मी माझे जीवन जगत राहीन'' अशी भावना. प्रेम म्हणजे केवळ हातात हात घालून फिरणे, चित्रपट पाहणे, भेटवस्तू देणे किंवा रोज हॉटेलमध्ये जेवायला जाणे नव्हे. या गोष्टी आनंद देतात, पण प्रेमाचा पाया त्याहून खूप खोल असतो.

प्रेम म्हणजे एकमेकांच्या सुखासाठी स्वतःला झोकून देणे. एकमेकांच्या स्वप्नांना आपले स्वप्न मानणे. संकटात खंबीरपणे उभे राहणे. कर्तव्याची जाणीव ठेवणे. त्याग करणे आणि कोणतीही



अपेक्षा न ठेवता नाते जपणे. प्रेम म्हणजे ''मी'' पासून ''आपण'' पर्यंतचा प्रवास.

आजचे युवक-युवती प्रेम व्यक्त करताना अनेक सुंदर वचने देतात. परंतु प्रेमाचा खरा अर्थ फक्त ''आपण आयुष्यभर एकत्र राहू'' एवढाच नाही. त्यापेक्षाही मोठी भावना म्हणजे, ''आपण एकमेकांचे आहोत आणि परिस्थिती कोणतीही असो, आपण एकमेकांच्या स्वप्नांचा, जबाबदाऱ्यांचा आणि मूल्यांचा सन्मान करू.'' हे समजणे आवश्यक आहे.

सौ. रेवती राहुल मोहरीर
(सहशिक्षिका)
केएलई इंग्लिश मीडियम स्कूल,
जुळे सोलापूर, सोलापूर
मो. 8928348598



खरे प्रेम तेच, जे संसाराला फ ुलवते. जे मुलांना चांगले संस्कार देते. जे कुटुंबासाठी कष्ट करते. जे भौतिक सुविधा निर्माण करण्यासाठी राबते, पण त्याच वेळी नात्यांची ऊबही जपते. प्रेम म्हणजे केवळ वर्तमानातील आनंद नव्हे; ते भविष्याची जबाबदारी स्वीकारण्याची तयारी आहे.

कधीकधी जीवनात अशी वेळ येते की प्रिय व्यक्ती प्रत्यक्ष सोबत नसते. पण तिच्या आठवणी, तिचे विचार, तिची शिकवण आणि तिचे प्रेम आपल्यासोबत असते. त्या आठवणींच्या आधारावरही संपूर्ण आयुष्य जगता येते. कारण प्रेम शरीराच्या सहवासात नसते; ते मनाच्या नात्यात असते. ते काळाच्या आणि अंतराच्या पलीकडे टिकून राहते. म्हणूनच मला वाटते, प्रेमाची सर्वोच्च व्याख्या म्हणजे ''तू माझ्यासोबत असलास तर आनंद आहे; पण तू नसशील तरी तुझ्या प्रेमाच्या बळावर, आपल्या कर्तव्यांची पूर्तता करत, आपल्या स्वप्नांना जपत आणि आपल्या मुलांना घडवत मी आयुष्य जगत राहीन.'' अशा प्रेमात स्वार्थ नसतो, मालकीभाव नसतो; असते ती फक्त निस्सीम आपुलकी, त्याग, विश्वास आणि समर्पण.

खरे प्रेम हे सहवासापेक्षा स्मृतींमध्ये अधिक जिवंत राहते. ते हात सुटले तरी मन सोडत नाही. ते अंतर वाढले तरी नाते तुटू देत नाही.आणि म्हणूनच खरे प्रेम हे केवळ एक भावना नसून, आयुष्यभर जपलेजाणारे एक पवित्र व्रत असते.

(ही शब्दसुमने माझी भगिनी प्राध्यापिका मानसी महेश देशपांडे यांना समर्पित)

****

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कर्वेनगरचे माजी संघचालक डॉ श्रीनिवास गोपाळ सुरंगे यांचे निधन

ज्योतिर्मय साहित्य

पुणे - कर्वेनगर येथील ''कपिल वास्तू'' मधील रहिवासी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कर्वेनगर चे माजी संघचालक डॉ श्रीनिवास गोपाळ सुरंगे यांचे २९ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.मृत्युसमयी त्यांचे वय ९२ वर्षे होते.

दिल्ली येथील लेडी हार्डिंग वैद्यकीय महाविद्यालयात शरीरक्रियाशास्त्राचे प्राध्यापक म्हणून सेवानिवृत्त झाले.त्यानंतर १९९२ मध्ये ते पुण्यात स्थायिक झाले.

त्यांचे पश्चात पत्नी -कुंदा,दोन विवाहित मुली -माधुरी,भारती,मुलगा -रवींद्र,सून,नातवंडे असा परिवार होत.

मृत्यूनंतर त्यांनी नेत्रदान व देहदान केले.


डॉ सुरंगे यांचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यात मोठे योगदान होते. अनेक सामाजिक संस्थांशी त्यांचा संपर्क होता.

सेवा,शिक्षण आणि समाजासाठी योगदान या मूल्यांनी त्यांचे जीवन समृद्ध झाले होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये कर्वेनगर संघचालक,रा.स्व.संघ जनकल्याण समिती पुणे महानगराचे अध्यक्ष,संघ शिक्षा वर्ग (प्रथम वर्ष)चे सर्वाधिकारी अश्या अनेक जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या होत्या.

डॉ श्रीनिवास सुरंगे यांचा जन्म कानपूर येथे झाला.त्यांचे बालपण मध्यप्रदेशातील अनेक ठिकाणी गेले.ग्वाल्हेर येथे वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर नवी दिल्ली येथील भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत येथे शरीरक्रियाशास्त्र मध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतले नंतर केंद्र शासकीय आरोग्य सेवेमध्ये त्यांनी दिल्ली,शिमला,पाँडिचेरी येथे वैद्यकीय सेवा दिली.

ईराक,लिबिया येथेही वैद्यकीय सेवेत ते होते.



केंद्रीय आरोग्य खात्यामध्ये अनेक वर्षे वैद्यकीय प्राध्यापक म्हणून काम केले.

येत्या १० ऑक्टोबर रोजी कर्वे स्त्री शिक्षणसंस्थेतील कमिन्स इंजिनियरिंग महाविद्यालयातील ''के बी जोशी सभागृहा''मध्ये सायंकाळी सहा वाजता श्रद्धांजली सभेचे आयोजन

डॉ श्रीनिवास सुरंगे यांच्या प्रेरणादायी स्मृतींना उजाळा देण्यासाठी येत्या शनिवारी दिनांक १० ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहा वाजता कर्वेनगर येथील कमिन्स इंजिनियरिंग महाविद्यालयातील ''के.बी. जोशी''सभागृहामध्ये श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित केला आहे.सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन छत्रपती संभाजीभाग संघचालक अनिल व्यास यांनी केले आहे

घराचे घरपण....

ज्योतिर्मय साहित्य

अंधाराची कुस हळूहळू उजवायला लागते,अन् डोळे चोळायला लागल्यावर अंगणातल्या झाडावरून येणारा चिवचिव आवाज घराच्या कोपऱ्या कोपऱ्यात विसावतो. काही क्षणांच्या विश्रांतीनंतर अंगणात विसावायला आलेले ऊन अंगणभर पसरते,आणि हळू हळू सरकत घराच्या पायऱ्या चढत घरात विसावते.कुठल्याशा कवडश्यातून अवचित घरात येते आणि रोज येऊन त्याचे त्याचे एक नाते होऊन जाते. जीवनाचा हा अव्याहत असा प्रवास सुरूच असतो.

कुस उजवता रात्रीची
दिवस होतो सुरू,
हळूवार किलबिलाटाने
आनंद लागतो पसरू.
अंगणातल्या फुलांचा सुगंध
घरभर लागतो दरवळू
भरलेल्या घरात घुमू
लागतो आवाज एक मायाळू.

एक चंद्रसवैरा जणू..! घरात विसावलेले ऊन,किलबिलाटाने झालेली सुरुवात हळूवार मध्यानीकडे धाव घेत असते. क्षणाक्षणाने वाढत जाणारी अर्थात प्रतीकात्मक ती (वेळ) तो (सूर्य)कला कलाने पुढे चाललेली असते. दगदगीच्या



धावपळीच्या प्रवाहात कधी मध्यान्ही कडे झुकते हे कळतही नाही.


घरभर चाललेला गडबड गोंधळ मध्यान्हीला उन्हाच्या त्या रुखरुख्यापणात हरवून जातो.


गजबजाट किलबिलाट
क्षण सारे भारावलेले.
भर मध्यान्हीला त्या थोडे निवाववले विसावलेले.

कुठल्याशा कोपऱ्यात ऐकू येणारी त्या रातकिड्यांची किर किर अन् मन मेंदूला सुन्न करणारा तो आवाज, उन्हाच्या त्या काहिलीत बाहेर अंगणात उमटलेल्या बाहेर जाणाऱ्या त्या अस्पष्ट पाऊलखुणा परत माघारी येतानाची वाट पाहणारी अंगणातली ती झाडे, जाणिवेतली ती आस, दूर पाखरांची चाहूल लागताच वाऱ्याची मंद झुळूक यावी अन्..!

ऋतुचक्राचे हे वैविध्याने सजलेले रंग किती निराळे हो ना..!

क्रमशः








'पिता-पुत्र'

हे सगळं आज कळतंय, पण आता सांगायला माझे बाबा मात्र राहिले नाहीत! या आठवणींनी डोळे आजही नकळत भरून येतात. हे नक्षत्रांचे देणे खरोखर द्यायचे राहून गेले...
वडिलांनी मुलासाठी आपल्या कर्तव्यात कधी कोणतीही कसर ठेवली नव्हती; मुलानेही त्यांच्या शब्दाबाहेर कधी पाऊल टाकले नाही. पण तरीही, "बाबा, माझं तुमच्यावर खूप प्रेम आहे, तुम्ही मला हवे आहात!" हे चार शब्द जोपर्यंत ते हयात होते, तोपर्यंत प्रत्यक्ष त्यांच्या डोळ्यांत पाहून बोलण्याचे राहूनच गेले. हा संकोच म्हणा की अहंकार म्हणा बहुधा जगातल्या प्रत्येक बाप-लेकाच्या नात्यात आडवा येत असावा. बापाचं प्रेम हे जमिनीखाली खोलवर गेलेल्या वटवृक्षाच्या मुळांसारखं असतं; ते वरून हिरवंगार दिसत नाही, पण संपूर्ण संसाराला वादळात घट्ट रोवून धरतं. मुलगा वयात आला, की वडिलांच्या चपला त्याच्या पायात बसू लागतात. मग सुरू होतो एक आदरयुक्त संकोच. बाप मुलाच्या तोंडावर कधी कौतुक करत नाही, पण बाहेर चारचौघांत अभिमानाने सांगतो, "माझ्या पोराने नाव काढलं बरं का!"

॥ श्री गणेश चिंतन ॥



समर्थ रामदास स्वामी कृपेने मनाचे श्लोक व दासबोधाच्या आधाराने "गणेश उत्सवात १० दिवस नियमित एक गणेश चिंतन करू या कारण "जो स्वतः शुभ झाला तोच शुभारंभ करू शकतो"

कृतज्ञ मी कृतार्थ मी, भगवंत हृदयस्थ आहे 🙏 अपर्णा परांजपे कात्रज पुणे

पण समर्थांचा आशय केवळ एवढाच नाही. सूर्य अंधाराशी युद्ध करत नाही.तो अंधाराला हाकलत नाही.
तो फक्त प्रकाशतो.आणि प्रकाश प्रकट झाला की अंधार स्वतंत्र वस्तू म्हणून उरत नाही.याच धर्तीवर
सद्गुरू अज्ञानाशी संघर्ष करत नाहीत; ते ज्ञानाचा प्रकाश देतात.अज्ञान निवृत्त होते.
३. पण सद्गुरू सूर्यापेक्षाही वेगळे का?
याचाच पुढे समर्थांनी विलक्षण प्रत्ययकारी विस्तार केला आहे.
तैसा नव्हे स्वामीराव । करी जन्ममृत्य वाव ।
समूळ अज्ञानाचा ठाव । पुसून टाकी ॥११॥
ही ओवी आपण आजच्या भागाचा मध्यबिंदू मानूया.
समर्थ म्हणतात—"तैसा नव्हे..."म्हणजे सूर्याची उपमा दिली, पण सद्गुरूचे कार्य त्याहून खोल आहे.
सूर्य—अंधार दूर करतो.
सद्गुरू—"समूळ अज्ञानाचा ठाव पुसून टाकतात."
हा फरक अत्यंत महत्त्वाचा आहे.
४. "अज्ञानाचा ठाव" म्हणजे काय?
इथे "अज्ञान" म्हणजे केवळ एखादी गोष्ट माहीत नसणे नव्हे.
उदाहरणार्थ—
मला एखादा श्लोक माहीत नाही → हे सामान्य अज्ञान.
पण—"मी देह आहे""मी कर्ता आहे""मी भोक्ता आहे"
"मी या जगापासून वेगळा आहे"
या मूलभूत चुकीच्या आत्मसमजुतीला वेदान्ताच्या भाषेत अविद्या/अज्ञान म्हणतात.
म्हणून समर्थांचे—"समूळ अज्ञानाचा ठाव पुसून टाकी"
हे केवळ माहिती देण्याचे कार्य नाही.हे "मी कोण?" या मूलभूत भ्रमावर प्रहार आहे.
५. "जन्ममृत्यु वाव" — किती खोल शब्द!
करी जन्ममृत्य वाव ।"वाव" म्हणजे व्यर्थ, निष्फळ/निरर्थक करून टाकणे —या अर्थाने हा आशय समजतो.
म्हणजे सद्गुरूंच्या ज्ञानाने जन्म-मृत्यूच्या चक्राला आधार देणारे अज्ञानच नष्ट होते.
इथे पुन्हा एक सूक्ष्म भेद ठेवूया:
समर्थ असे म्हणत नाहीत की सद्गुरू शरीराचा मृत्यू थांबवतात. (क्रमशः)

विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013

जीवनात 'नाही' म्हणायला शिकणं का गरजेचं?

आपल्या आयुष्यातला एक छोटासा शब्द... पण बोलायला सर्वांत कठीण—"नाही."
कुणी मदत मागितली की आपण हो म्हणतो.
कुणी अतिरिक्त काम सांगितलं की हो म्हणतो.
कुणाला आपली गरज वाटली की हो म्हणतो.
आणि मन मात्र शांतपणे म्हणत राहतं—
"मला हे खरंच करायचं नाही..."
तरीही आपण हो म्हणतो.
कारण आपल्याला भीती असते—समोरचा रागावेल, गैरसमज करून घेईल,
आपल्याला स्वार्थी समजेल किंवा नातं बिघडेल.
पण प्रत्येक वेळी दुसऱ्याला आनंदी ठेवण्यासाठी स्वतःच्या मनाला दुखावणं योग्य आहे का?
नाही.
"नाही" म्हणणं म्हणजे उद्धटपणा नाही.
स्वार्थीपणा नाही.
नात्यांची किंमत कमी करणं नाही.
"नाही" म्हणजे स्वतःच्या मर्यादा ओळखणं.
दुसऱ्याच्या कामाला हो म्हणताना आपण आपल्या विश्रांतीला नाही म्हणतो.
दुसऱ्याच्या अपेक्षांना हो म्हणताना आपल्या स्वप्नांना नाही म्हणतो.
सगळ्यांना वेळ देताना स्वतःच्या माणसांना नाही म्हणतो.
लोक काय म्हणतील याचा विचार करताना आपल्या मनाचा आवाज दाबतो.
म्हणून "नाही" शिकणं आवश्यक आहे.
पण "नाही" कसं म्हणायचं?
कठोरपणे नाही.
आपण म्हणू शकतो—
"सध्या माझ्याकडे वेळ नाही."
"मला हे शक्य होणार नाही."
"मला विचार करण्यासाठी थोडा वेळ हवा आहे."
"मला हे करायला सोयीचं वाटत नाही."
स्पष्टीकरण देणं आवश्यक असेलच असं नाही. प्रत्येक निर्णयासाठी अपराधी वाटून घेण्याचीही गरज नाही.
आणखी एक महत्त्वाची गोष्ट—"नाही" म्हणजे कायमचा दरवाजा बंद करणं नाही.

नाना पाटेकर : अभिनयाचा नटसम्राट आणि माणुसकीचा महामानव हरपला

८ ऑक्टोबरची सकाळ चित्रपट रसिकांसाठी अत्यंत दुःखद बातमी घेऊन आली. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे गोव्यात हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या ७५व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समोर येताच चित्रपटसृष्टीसह संपूर्ण मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली. पडद्यावर आपल्या दमदार आवाजाने, तीक्ष्ण नजरेने आणि प्रभावी अभिनयाने प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा हा असामान्य कलाकार अचानक कायमचा निघून गेला, यावर अनेक चित्रपट रसिकांचा विश्वासच बसत नव्हता.

नाना पाटेकर हे केवळ एक अभिनेते नव्हते; ते एक संस्था होते. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत जवळपास पाच दशके आपल्या अभिनयाची वेगळी छाप पाडणारा हा कलाकार आज आपल्यात नाही, ही जाणीवच मन हेलावून टाकणारी आहे.

संघर्षातून घडलेला कलाकार

१ जानेवारी १९५१ रोजी जन्मलेल्या नाना पाटेकर यांचे मूळ नाव विश्वनाथ पाटेकर. त्यांचा जन्म महाराष्ट्रातील मुरुड येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. शालेय जीवनातच त्यांनी नाटकांमध्ये काम करण्यास सुरुवात केली. पुढे त्यांनी सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिक्षण घेतले आणि काही काळ जाहिरात संस्थेतही काम केले.

चित्रपटसृष्टीत येण्यापूर्वीचा त्यांचा काळ मात्र अत्यंत संघर्षमय होता. रंगभूमीवर काम करताना मिळणारे मानधन अत्यल्प होते. प्रसिद्धी, पैसा आणि ग्लॅमर यापासून ते त्या काळी खूप दूर होते. मात्र अभिनयाची जिद्द त्यांनी कधी सोडली नाही. जाहिरातीचे काम आणि रंगभूमी अशी तारेवरची कसरत करत त्यांनी स्वतःला घडवले.

१९७८ मध्ये गमन या चित्रपटातून त्यांनी रुपेरी पडद्यावर पदार्पण केले. सुरुवातीला छोट्या भूमिका मिळत राहिल्या. जवळपास दशकभर संघर्ष केल्यानंतर हमीदाबाईची कोठी या नाटकाने त्यांच्या अभिनयाची ताकद रंगभूमीवर अधोरेखित केली. त्यानंतर त्यांच्या कारकिर्दीने वेग घेतला.

आवाज, नजर आणि अभिनयाची स्वतंत्र शैली

नाना पाटेकर यांचा अभिनय हा पारंपरिक चौकटीत बसणारा नव्हता. त्यांची संवादफेक, आवाजातील चढ-उतार, चेहऱ्यावर क्षणार्धात बदलणारे भाव, संताप व्यक्त करण्याची पद्धत आणि व्यक्तिरेखेच्या मनोविश्वात पूर्णपणे शिरण्याची क्षमता यामुळे ते इतर कलाकारांपेक्षा वेगळे ठरले.

त्यांनी खलनायकाच्या भूमिका केल्या, नायकाच्या भूमिका केल्या, पोलिसांच्या भूमिका केल्या, सैनिकाची भूमिका केली, सामाजिक आशयाच्या व्यक्तिरेखा साकारल्या आणि वेलकमसारख्या चित्रपटात विनोदी भूमिकेने प्रेक्षकांना मनमुराद हसवले.

मोहरे, सलाम बॉम्बे!, परिंदा, अंगार, तिरंगा, क्रांतिवीर, युगपुरुष, खामोशी, गुलाम-ए-मुस्तफा, यशवंत, वजूद, अब तक छप्पन, अपहरण, टॅक्सी नं. ९२११, वेलकम, देऊळ, नटसम्राट अशा असंख्य चित्रपटांमधून त्यांनी आपल्या अभिनयाची विविध रूपे दाखवली. परिंदामधील अण्णा, क्रांतिवीरमधील प्रताप नारायण तिलक आणि वेलकममधील उदय शेट्टी या व्यक्तिरेखा त्यांच्या अभिनयाच्या बहुआयामी क्षमतेची उदाहरणे ठरल्या.

परिंदापासून क्रांतिवीरपर्यंत पुरस्कारांची दखल

नाना पाटेकर यांच्या अभिनयाची दखल केवळ प्रेक्षकांनीच नव्हे तर देशातील प्रतिष्ठित पुरस्कारांनीही घेतली. परिंदासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. त्याच भूमिकेसाठी फिल्मफेअर पुरस्कारही मिळाला. क्रांतिवीरमधील प्रभावी अभिनयासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. अग्निसाक्षीसाठी पुन्हा एकदा राष्ट्रीय पुरस्काराने त्यांच्या अभिनयाचा गौरव झाला. अशा प्रकारे नाना पाटेकर यांनी तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळवले.

अंगार आणि अपहरणमधील नकारात्मक भूमिकांसाठी त्यांना फिल्मफेअर पुरस्कार मिळाले. अब तक छप्पनसाठी बंगाल फिल्म जर्नलिस्ट्स असोसिएशनचा सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार मिळाला. मराठी चित्रपट डॉ. प्रकाश बाबा आमटे द रिअल हिरोसाठी फिल्मफेअर मराठी पुरस्कार मिळाला. नटसम्राटमधील भूमिकेसाठी झी गौरव पुरस्कारानेही त्यांचा सन्मान झाला. २०१३ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री या देशातील प्रतिष्ठित नागरी सन्मानाने गौरवले.

प्रहारसाठी सैनिकासारखे जगले

नाना पाटेकर यांनी अभिनयाइतक्याच गांभीर्याने आपल्या भूमिकांची तयारी केली. प्रहार : द फायनल अटॅक या चित्रपटातील कमांडोची भूमिका वास्तवदर्शी करण्यासाठी त्यांनी लष्करी प्रशिक्षण घेतले. या चित्रपटातून त्यांनी दिग्दर्शक म्हणूनही पदार्पण केले. भूमिकेच्या तयारीसाठी स्वतःला झोकून देण्याची त्यांची ही वृत्ती त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत दिसून आली. पडद्यावर दिसणाऱ्या प्रत्येक व्यक्तिरेखेमागे नानांची प्रचंड मेहनत असायची.

नटसम्राटमध्ये अभिनयाचा कळस

नाना पाटेकर यांच्या कारकिर्दीचा विचार केला तर नटसम्राटचा उल्लेख केल्याशिवाय तो पूर्ण होऊ शकत नाही. वि. वा. शिरवाडकर यांच्या अजरामर नाटकावर आधारित या चित्रपटात त्यांनी गणपतराव बेलवलकरांची भूमिका साकारली. रंगभूमीवर आयुष्य घालवलेल्या, टाळ्यांचा कडकडाट अनुभवलेल्या आणि वृद्धापकाळात एकाकीपणाशी झुंजणाऱ्या कलाकाराची वेदना नानांनी इतक्या ताकदीने साकारली की गणपतराव बेलवलकर ही व्यक्तिरेखा आणि नाना पाटेकर हे जणू एकरूप झाले. राग, प्रेम, अहंकार, असहायता, वेदना आणि एकटेपणा या सगळ्या भावनांचा विलक्षण आविष्कार या भूमिकेत पाहायला मिळाला.



कलाकारापलीकडचा माणूस

नाना पाटेकर यांचे मोठेपण केवळ त्यांच्या अभिनयात नव्हते. त्यांच्या मनात सामान्य माणसासाठी असलेली आस्था त्यांच्या सामाजिक कार्यातून दिसून आली. २०१५ मध्ये नाना पाटेकर आणि अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी 'नाम फाउंडेशन' ची स्थापना केली. महाराष्ट्रातील दुष्काळ, पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर या संस्थेचे काम सुरू झाले. शेतकऱ्यांच्या कुटुंबांना तातडीची आर्थिक मदत देण्याबरोबरच त्यांच्या समस्येच्या मुळावर काम करण्याचा प्रयत्न नाम फाउंडेशनने केला.

जलसंधारणातून दुष्काळावर मात करण्याचा प्रयत्न

शेतकऱ्यांना केवळ मदतीचे पैसे देऊन त्यांची समस्या कायमची सुटणार नाही, हे नाना आणि नाम फाउंडेशनने ओळखले. त्यामुळे जलसंधारण आणि ग्रामीण विकासावर मोठ्या प्रमाणावर काम करण्यात आले.

नदीपात्रांचे पुनरुज्जीवन, नाले व ओढ्यांचे खोलीकरण, पाझर तलावांचे गाळ काढणे, कालव्यांची दुरुस्ती व बांधकाम, शेततळी निर्माण करणे, धरणांमधील गाळ काढणे आणि भूजलपातळी वाढविण्यासाठी विविध कामे करण्यात आली. नाम फाउंडेशनच्या माहितीनुसार त्यांच्या जलसंधारणाच्या उपक्रमांतून महाराष्ट्रातील हजारो गावांमध्ये पाण्याची उपलब्धता वाढवण्याचा प्रयत्न झाला असून अनेक नद्या, जलसाठे आणि पाणलोट क्षेत्रांच्या पुनरुज्जीवनाची कामे करण्यात आली आहेत. ही कामे केवळ पाणी अडवण्यापुरती नव्हती; तर शेतकऱ्याला पुन्हा शेतीकडे आत्मविश्वासाने पाहता यावे, गावात रोजगार आणि जगण्याची आशा निर्माण व्हावी, हा त्यामागचा व्यापक उद्देश होता.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी आधाराचा हात

२०१५ च्या भीषण दुष्काळाच्या काळात शेतकरी आत्महत्यांची संख्या वाढत असताना अनेक कुटुंबांवर अक्षरशः आभाळ कोसळले. पती गमावलेल्या महिलांसमोर मुलांचे शिक्षण, घरखर्च आणि शेतीचे भवितव्य असे अनेक प्रश्न उभे राहिले. नाम फाउंडेशनने अशा कुटुंबांना आर्थिक आणि नैतिक आधार देण्याचे काम केले. संस्थेच्या माहितीनुसार आतापर्यंत ४,९४० आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना आर्थिक मदत देण्यात आली असून १,९०० विधवांनाही मदत करण्यात आली आहे. ही मदत केवळ आर्थिक नव्हती; संकटात सापडलेल्या कुटुंबाला आपण एकटे नाही, असा आधार देण्याचा त्यामागचा प्रयत्न होता.

नाना पाटेकर यांनी शेतकऱ्यांच्या मानसिक वेदनेविषयीही सातत्याने आवाज उठवला. त्यांच्या सामाजिक कामामध्ये केवळ मदतवाटप नव्हते, तर शेतकऱ्याच्या जगण्याचा प्रश्न

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

समजून घेण्याची आणि त्याला पुन्हा उभे करण्याची धडपड होती. २०२६ मध्येही त्यांनी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आत्महत्येऐवजी मदतीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले होते.

'नाना' म्हणून माणसांच्या मनात राहिले

चित्रपटाच्या पडद्यावर कधी संतापाने गर्जणारा, कधी डोळ्यांतून वेदना व्यक्त करणारा, कधी खलनायक म्हणून अंगावर येणारा, तर कधी वेलकममधून प्रेक्षकांना हसवणारा नाना पाटेकर खऱ्या आयुष्यात मात्र शेतकऱ्यांच्या वेदनेशी जोडला गेला.

त्यांनी प्रसिद्धीचा उपयोग केवळ स्वतःसाठी केला नाही. दुष्काळग्रस्त गावांमध्ये पाणी निर्माण व्हावे, शेतकऱ्याच्या घरात पुन्हा चूल पेटावी आणि आत्महत्येच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या कुटुंबाला जगण्याची उमेद मिळावी, यासाठी त्यांनी आपली लोकप्रियता आणि प्रभाव समाजकार्यासाठी वापरला.

म्हणूनच नाना पाटेकर यांना निरोप देताना केवळ एका महान अभिनेत्याला आपण श्रद्धांजली वाहत नाही; तर संघर्षातून उभा राहिलेल्या, कलेला आयुष्य समर्पित केलेल्या आणि माणुसकीला आपल्या परीने हातभार लावलेल्या एका संवेदनशील माणसाला आपण निरोप देत आहोत.

नाना पाटेकर यांचा आवाज आता पडद्यावर नव्याने ऐकू येणार नाही. त्यांची ती धारदार नजर, ती दमदार संवादफेक आणि व्यक्तिरेखेत जीव ओतणारा अभिनय पुन्हा पाहायला मिळणार नाही. पण परिंदा, क्रांतिवीर, प्रहार, खामोशी, अब तक छप्पन, वेलकम, देऊळ, डॉ. प्रकाश बाबा आमटे द रिअल हिरो, नटसम्राट अशा असंख्य कलाकृतींमधून ते कायम आपल्या स्मरणात राहतील.

आणि नाम फाउंडेशनच्या माध्यमातून उभे राहिलेले पाणीसाठे, हिरवी झालेली गावे, मदतीचा हात मिळालेली शेतकरी कुटुंबे आणि जगण्याची नवी आशा मिळालेले असंख्य चेहरेहीदेखील त्यांच्या आयुष्याची तितकीच मोठी ओळख राहील.

अभिनयाचा 'नटसम्राट' हरपला आहे; पण त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा आणि त्यांनी केलेले माणुसकीचे काम त्यांना कायम जिवंत ठेवेल. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

****

अस्सल कलावंताला भावपूर्ण श्रद्धांजली

ज्योतिर्मय साहित्य

मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, रंगकर्मी आणि संवेदनशील सामाजिक कार्यकर्ते नाना पाटेकर यांच्या निधनाने भारतीय कलाविश्वातील एक प्रभावी पर्व संपले आहे. वयाच्या ७५व्या वर्षी ८ ऑक्टोबर २०२६ रोजी गोवा येथील निवासस्थानी त्यांचे निधन झाले. त्यांच्या जाण्याने असंख्य रसिकांच्या मनात हळहळ निर्माण झाली आहे.



नाना पाटेकर हे केवळ अभिनेते नव्हते; ते एक अस्सल कलावंत होते. रंगभूमीपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास चित्रपटसृष्टीत विलक्षण उंचीवर पोहोचला. त्यांच्या अभिनयात दिखाऊपणा नव्हता, तर व्यक्तिरेखेचा आत्मा पकडण्याची ताकद होती. भारदस्त आवाज, धारदार संवादफेक, प्रभावी देहबोली आणि भूमिकेत पूर्णपणे समरस होण्याची विलक्षण क्षमता यामुळे त्यांनी साकारलेली प्रत्येक व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटवत असे. 'परिंदा', 'क्रांतिवीर', 'तिरंगा', 'वेलकम' आणि 'नटसम्राट' यांसारख्या चित्रपटांमधून त्यांनी आपल्या अभिनयाचे विविध पैलू दाखवून दिले.

नाना पाटेकरांच्या अभिनयाची खरी ताकद त्यांच्या सहजतेत होती. ते संवाद म्हणत नसत, तर जणू व्यक्तिरेखाच बोलत आहे असे वाटत असे. गंभीर भूमिका असो, आक्रमक व्यक्तिमत्त्व असो किंवा विनोदी भूमिकाप्रत्येक रंग त्यांनी आपल्या स्वतंत्र शैलीने खुलविला. राष्ट्रीय पुरस्कारांसह अनेक सन्मानांनी त्यांच्या कलेचा गौरव झाला. २०१३ मध्ये त्यांना पद्मश्रीनेही सन्मानित करण्यात आले.

उद्धव भयवाळ
छत्रपती संभाजीनगर
मो.८८८८९२५४८८



मात्र नानांचे व्यक्तिमत्त्व केवळ रुपेरी पडद्यापुरते मर्यादित नव्हते. समाजातील सामान्य माणूस, शेतकरी आणि संकटग्रस्त कुटुंबांविषयी त्यांना विशेष आस्था होती. 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून त्यांनी शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबांना मदतीचा हात दिला. कलाकार म्हणून मिळालेली प्रसिद्धी त्यांनी सामाजिक बांधिलकीसाठीही वापरली, ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची मोठी जमेची बाजू होती.

नाना पाटेकर स्पष्टवक्ते होते. मनातले विचार निर्भीडपणे मांडण्याची त्यांची शैली त्यांच्या व्यक्तिमत्त्वाइतकीच वैशिष्ट्यपूर्ण होती. त्यांच्या शेवटच्या सार्वजनिक कार्यक्रमांपैकी एका कार्यक्रमात त्यांनी जीवनाच्या अनिश्चिततेची जाणीव करून देत, मिळालेला वेळ इतरांच्या सेवेसाठी वापरण्याचा संदेश दिला होता.

नानांचे जाणे ही केवळ एका अभिनेत्याची उणीव नाही; ती मराठी आणि भारतीय कलाविश्वाची मोठी हानी आहे. मात्र खऱ्या कलावंताचा अंत होत नाही. त्याच्या भूमिका, संवाद, विचार आणि कलाकृती पुढील पिढ्यांशी संवाद साधत राहतात. नाना पाटेकरही आपल्या अभिनयाच्या अजरामर ठशातून रसिकांच्या मनात सदैव जिवंत राहतील.

अस्सल अभिनयाचा हा बुलंद आवाज आज शांत झाला; पण त्याचा प्रतिध्वनी दीर्घकाळ भारतीय कलाविश्वात घुमत राहील. नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने अभिनय विश्वातील एक मोठे पर्व अस्तंगत

ज्योतिर्मय साहित्य

जबरदस्त अभिनय, प्रभावी संवादफेक आणि संवेदनशील मनाचा कलावंत आणि माणूसपण जपणारा माणूस, आपल्या सर्वांचा लाडके अभिनेते, नाना पाटेकर काल सकाळी काळाच्या पडद्याआड गेले. ज्येष्ठ अभिनेते, रंगकर्मी आणि सामाजिक जाणिवेचे भान व माणूस पण जपणारे लोकप्रिय कलावंत नाना पाटेकर यांचे ८ ऑक्टोबर २०२६ रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने गोवा येथे निधन झाले.

त्यांच्या निधनाने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली असून, आपल्या जबरदस्त अभिनयाने आणि वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारा एक असामान्य कलावंत काळाच्या पडद्याआड गेला आहे. १ जानेवारी १९५१ रोजी रायगड जिल्ह्यात मुरूड (जंजिरा) येथे जन्मलेल्या नाना पाटेकर यांचे मूळ नाव विश्वनाथ पाटेकर होते. त्यांचे वडील दिनकर पाटेकर हे चित्रकार, तर आई संजनाबाई पाटेकर. घरातील अश्या कलात्मक वातावरणामुळे लहानपणापासूनच नानांच्या मनात कलेची आवड निर्माण झाली होती,

घरातील प्रचंड आर्थिक अडचणीमुळे त्यांना अत्यंत संघर्षमय जीवन जगावे लागले. त्यामुळे वयाच्या अवघ्या १३व्या वर्षी त्यांनी काम करण्यास सुरुवात केली आणि लहान वयातच कुटुंबाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. मुंबईतील जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स येथे त्यांनी शिक्षण घेतले. महाविद्यालयीन जीवनातच नाटकांशी त्यांचा जवळचा संबंध आला आणि पुढे हाच रंगभूमीचा प्रवास त्यांच्या अभिनय कारकिर्दीचा भक्कम पाया ठरला.

नानांनी आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात प्रायोगिक रंगभूमीपासून केली. व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'गवराई' या नाटकातील त्यांची भूमिका खूप गाजली. प्रख्यात दिग्दर्शिका विजया मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली रंगभूमीवर काम करताना त्यांच्या अभिनयातील क्षमता, अभिनयाची ताकद, आवाजातील कणखरता आणि नाटक किंवा चित्रपटातील व्यक्तिरेखेत पूर्णपणे शिरण्याची क्षमता विलक्षण प्रतिभेची होती.

१९७८ मध्ये 'गमन' या चित्रपटातून त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. सुरुवातीला मिळेल ती भूमिका स्वीकारत संघर्ष करणाऱ्या नानांना 'अंकुश' या चित्रपटाने खऱ्या अर्थाने ओळख मिळवून दिली.



बेरोजगारीने त्रस्त युवकाची त्यांनी साकारलेली भूमिका आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहे. यानंतर प्रतिघात, परिंदा, सलाम बॉम्बे, प्रहार, राजू बन गया जंटलमन, क्रांतिवीर, अग्निसाक्षी, खामोशी, वजूद, पुरुष, टॅक्सी नंबर ९२११, राजनीती, अब तक छप्पन, गोलमाल अगेन अशा असंख्य चित्रपटांमधून त्यांनी आपल्या अभिनयाची वेगवेगळी रूपे रसिकांसमोर आणली. मराठी चित्रपटसृष्टीतही त्यांनी आपल्या अभिनयाची अमीट छाप सोडली. भालू, पक पक पकाक, देऊळ, नटसम्राट, आपला माणूस यांसारख्या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या. गंभीर भूमिका असो, खलनायक असो, नायक असो किंवा विनोदी व्यक्तिरेखा असो, नानांनी प्रत्येक भूमिकेला स्वतःची एक वेगळी ओळख करून न्याय दिला. त्यांचा जबरदस्त आवाज, संवादफेक, देहबोली आणि डोळ्यांतून भावना व्यक्त करण्याची विलक्षण ताकद ही त्यांच्या अभिनयाची खासियत होती.

गिरीश खं. वसेकर
नांदेड सिटी, सिंहगड रोड,
पुणे ९४२२६५९४००



त्यांच्या अनेक संवादांना त्यांनी अक्षरशः अजरामर केले. नानांचा एखादा संवाद कानावर पडला तरी त्यांचा चेहरा डोळ्यांसमोर उभा राहतो, हेच त्यांच्या लोकप्रियतेचे खरे गमक होते. चित्रपटांच्या जाहिराती लावण्यापासून ते भारतीय चित्रपटसृष्टीतील आघाडीचा अभिनेता होण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास संघर्ष, जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाने भरलेला होता. सिने इंडस्ट्रीत मध्ये कोणताही गॉडफादर नसताना, केवळ आपल्या क्षमतेच्या व कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी अभिनयविश्वात स्वतःचे अढळ स्थान निर्माण केले. नाना केवळ अभिनेते नव्हते,ते संवेदनशील माणूस आणि सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्त्व होते.

अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्यासोबत त्यांनी महाराष्ट्रात 'नाम फाउंडेशन' उभारून दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी आणि आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदतीचा हात दिला. जलसंधारणासह विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांनी योगदान दिले. पुरस्कारांमधून मिळालेली रक्कमही त्यांनी अनेकदा सामाजिक कार्यासाठी वापरली. अभिनयासोबतच नानांना रायफल शूटिंगचीही आवड होती. वयाच्या पन्नाशीनंतर त्यांनी या क्षेत्रात विशेष रस घेतला आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्येही उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय कारकिर्दीचा गौरव अनेक मान-सन्मानांनी झाला. राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, फिल्मफेअर पुरस्कार, पद्मश्री, मास्टर दीनानाथ मंगेशकर विशेष पुरस्कार आणि गदिमा पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले. भारतीय प्रादेशिक सैन्यात त्यांना मानद लेफ्टनंट कर्नल पदही बहाल करण्यात आले होते. कधी स्पष्टवक्ता, कधी तत्त्वनिष्ठ, कधी रागीट तर कधी समाजातील सामान्य माणसाच्या वेदना आपल्या अभिनयातून मांडणारा हा कलावंत प्रत्येक भूमिकेशी एकजीव होत असे.

पडद्यावरचा नाना जितका प्रभावी होता, तितकाच पडद्यामागचा माणूसही संवेदनशील होता.नाना पाटेकर म्हणजे केवळ एक अभिनेते नव्हते,तेअभिनयाचे एक चालते बोलते विद्यापीठ होते असे म्हटले तर फारसे चुकीचे ठरवू नये. त्यांच्या जाण्याने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील एक बुलंद आवाज शांत झाला आहे. अभिनयाच्या विश्वातील एक तेजस्वी तारा मावळला असला, तरी त्यांनी साकारलेल्या भूमिका , त्यांचे संवाद, त्यांचा आवाज आणि त्यांच्या अभिनयाची विलक्षण जादू रसिकांच्या स्मरणात राहील,यात काहीच शंका नाही. नानांच्या जाण्याने भारतीय नाटक व चित्रपट क्षेत्रातील एका मोठ्या पर्वाचा अंत झाला आहे. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो.

ॐ शांती

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

ग्रंथालये बंद होणे म्हणजे वाचन संस्कृतीसमोरील मोठे आव्हान

ज्योतिर्मय साहित्य

महाराष्ट्राला संत, साहित्यिक, विचारवंत आणि समाजसुधारकांची समृद्ध परंपरा लाभली आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, साने गुरुजी यांच्यासारख्या अनेक महान व्यक्तींनी समाजाच्या वैचारिक जडणघडणीत वाचन आणि ज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले. पुस्तक हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून माणसाला विचार करायला शिकवणारे, प्रश्न विचारण्याची ताकद देणारे आणि समाजाकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची दृष्टी देणारे माध्यम आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांची घटती संख्या ही केवळ एका संस्थेची समस्या नसून आपल्या वाचन संस्कृतीसमोरील गंभीर आव्हान आहे.

राज्य ग्रंथालय संचालनालयाच्या आकडेवारीनुसार, गेल्या तीन वर्षांत महाराष्ट्रातील ९९३ मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालये बंद झाली आहेत, ही बाब निश्चितच चिंताजनक आहे. २०२२ मध्ये राज्यात १२ हजार १४९ सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत होती. त्यानंतर ही संख्या सातत्याने कमी होत गेली आणि २०२४ अखेरपर्यंत कार्यरत ग्रंथालयांची संख्या सुमारे ११ हजार १५० वर आली. आकडेवारीकडे केवळ संख्येच्या दृष्टीने पाहणे योग्य ठरणार नाही. प्रत्येक बंद झालेले ग्रंथालय म्हणजे त्या परिसरातील विद्यार्थी, तरुण, ज्येष्ठ नागरिक, शिक्षक, साहित्यप्रेमी आणि सामान्य वाचकांसाठी उपलब्ध असलेले एक ज्ञानकेंद्र कमी होणे होय.

ग्रंथालय म्हणजे ज्ञानाचे लोकशाही केंद्र

सार्वजनिक ग्रंथालयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते समाजातील प्रत्येक व्यक्तीसाठी खुले असते. आर्थिक परिस्थिती चांगली असो किंवा सामान्य असो, प्रत्येकाला तेथे पुस्तके वाचण्याची संधी मिळते. विशेषतः ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागातील विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालये अत्यंत महत्त्वाची आहेत. महागडी पुस्तके विकत घेणे अनेक विद्यार्थ्यांना शक्य नसते. अशा वेळी ग्रंथालयातील संदर्भग्रंथ, स्पर्धा परीक्षांची पुस्तके, वर्तमानपत्रे आणि नियतकालिके त्यांच्या शिक्षणाला मोठी मदत करतात.

अनेक ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी सार्वजनिक ग्रंथालयांच्या मदतीने स्पर्धा परीक्षांची तयारी केली आहे. काहींनी अधिकारी होण्याचे स्वप्न साकार केले, तर काहींनी साहित्य, पत्रकारिता, शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले. त्यामुळे ग्रंथालय बंद होणे म्हणजे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या एका महत्त्वाच्या दारावर कुलूप लागण्यासारखे आहे.

बंद होण्यामागे अनेक कारणे

सार्वजनिक ग्रंथालये बंद होण्यामागे एकच कारण नाही. ग्रामीण भागातील अनेक ग्रंथालयांना अपुरी आर्थिक मदत, वाढता भाडे व देखभाल खर्च, वीजबिल, कर्मचाऱ्यांचे मानधन, नवीन पुस्तकांची वाढती किंमत आणि आवश्यक पायाभूत सुविधांचा अभाव यांचा सामना करावा लागतो.

आजच्या काळात केवळ कपाटांमध्ये पुस्तके ठेवणे पुरेसे राहिलेले नाही. वाचकांना संगणक, इंटरनेट, डिजिटल संदर्भसाहित्य, ई-बुक्स आणि ऑनलाइन माहितीचीही गरज आहे. मात्र अनेक ग्रंथालयांमध्ये संगणकीकरण आणि इंटरनेटची सुविधा अद्याप पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही. परिणामी आधुनिक पिढीतील अनेक तरुण ग्रंथालयांपासून दूर जात आहेत.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

दुसरीकडे, मोबाईल आणि सोशल मीडियामुळे माहिती सहज उपलब्ध होत आहे. त्यामुळे पुस्तक हातात घेऊन शांतपणे वाचण्याची सवय कमी होत असल्याचे चित्र दिसते. माहिती मिळवणे सोपे झाले असले तरी माहितीचे आकलन, विश्लेषण आणि चिकित्सक विचार करण्यासाठी सखोल वाचनाची गरज कायम आहे. सोशल मीडियावरील छोट्या संदेशांमधून मिळणारी माहिती आणि पुस्तकातून मिळणारे सखोल ज्ञान यामध्ये मोठा फरक आहे.

डिजिटल युगामुळे ग्रंथालयांचे महत्त्व कमी झाले का?

डिजिटल युगामुळे ग्रंथालयांचे स्वरूप बदलण्याची गरज निर्माण झाली आहे; मात्र त्यांचे महत्त्व कमी झालेले नाही. उलट, डिजिटल साधनांचा योग्य वापर करून ग्रंथालये अधिक प्रभावी बनवता येऊ शकतात.

आज ग्रंथालयात पारंपरिक पुस्तकांसोबत ई-बुक्स, डिजिटल संग्रह, ऑनलाइन नियतकालिके, स्पर्धा परीक्षांचे डिजिटल साहित्य, शैक्षणिक व्हिडिओ आणि इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देता येतात. विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज भरणे, शैक्षणिक माहिती शोधणे आणि विविध परीक्षांसाठी डिजिटल अभ्याससाहित्य मिळवून देणे शक्य आहे.म्हणून मोबाईल आणि इंटरनेट हे ग्रंथालयांचे प्रतिस्पर्धी न मानता त्यांना ग्रंथालयाच्या ज्ञानप्रसाराचे आधुनिक साधन बनवणे आवश्यक आहे. 'पुस्तकालय ते डिजिटल ज्ञानालय' असा प्रवास करण्याची हीच योग्य वेळ आहे.

वाचनाची सवय कमी होणे धोकादायक

आज अनेक मुलांच्या आणि तरुणांच्या हातात मोबाईल आहे; परंतु त्याच हातात पुस्तक किती वेळ असते, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. सततच्या मोबाईल वापरामुळे एकाग्रतेने वाचण्याची सवय कमी होत आहे. सोशल मीडिया, मनोरंजनाचे विविध पर्याय आणि झटपट माहितीच्या संस्कृतीमुळे सखोल वाचनासाठी वेळ देण्याची प्रवृत्ती कमी होत आहे.

वाचन माणसाला केवळ माहिती देत नाही, तर त्याची भाषा समृद्ध करते, कल्पनाशक्ती वाढवते, विचारशक्ती विकसित करते आणि संवेदनशीलता वाढवते. चांगले साहित्य वाचणारा समाज अधिक चिकित्सक, संवेदनशील आणि विवेकी बनतो. त्यामुळे वाचनाची सवय कमी होणे ही भविष्यातील पिढीच्या बौद्धिक विकासासाठी चिंतेची बाब आहे.


शासनाची भूमिका महत्त्वाची

ग्रंथालयांच्या अनुदानात ४० टक्के वाढ करण्याची घोषणा सकारात्मक पाऊल आहे. मात्र अनुदान वाढवण्याबरोबरच त्याचा योग्य वापर आणि त्याचा प्रत्यक्ष लाभ गरजू ग्रंथालयांपर्यंत पोहोचतो आहे का, याचीही नियमित तपासणी होणे आवश्यक आहे. ग्रंथालयांना केवळ इमारत आणि पुस्तके देऊन काम पूर्ण होत नाही.

(क्रमशः)

न लिहिलेले पत्र : भाग १ : पत्र हरवले, भावना राहिली

ज्योतिर्मय साहित्य



९ ऑक्टोबर हा जागतिक टपाल दिन. १८७४ मध्ये याच दिवशी जगातील टपालव्यवस्थेला एकत्र आणणाऱ्या युनिव्हर्सल पोस्टल युनियन म्हणजेच जागतिक टपाल संघाची स्थापना झाली. टपाल आणि पत्रलेखन यांचा संबंध तर अतूटच. एकेकाळी दूर असलेल्या माणसांना जवळ आणणारे, मनातील भावना शब्दबद्ध करून एका हातातून दुसऱ्या हातात पोहोचविणारे पत्र हेच संवादाचे एक महत्त्वाचे माध्यम होते. आजच्या डिजिटल युगात ई-मेल, व्हाटस अप आणि अन्य तत्काळ संदेशव्यवहारामुळे हस्तलिखित पत्र जवळजवळ विस्मृतीत गेले आहे. म्हणूनच या जागतिक टपाल दिनाच्या निमित्ताने मला एका वेगळ्याच पत्राबद्दल लिहावेसे वाटते, 'न लिहिलेल्या पत्राबद्दल'.

भारतात आपल्या सुकन्येला, म्हणजे प्रियदर्शिनीला, श्री. जवाहरलाल नेहरूंनी अहमदनगरच्या तुरुंगातून लिहिलेली पत्रे भारताचा शोध या नावाने प्रसिद्ध आहेत. त्यावर ऐंशीच्या दशकात दूरदर्शनवर भारत एक खोज ही एक प्रदीर्घ मालिका दाखविण्यात आली होती. छान होती ती मालिका. अवश्य पहा. जरी पाहिली असली तरी पुन्हा पहा.



नुकतेच एक पुस्तक माझ्या निदर्शनास आले. 'न पाठवलेले पत्र' श्री. महात्रया रा. यांनी लिहिले आहे. या पुस्तकाचे मूळ इंग्रजी नाव अनपोस्टेड लेटर्स असून त्याचा मराठी अनुवाद हेमलता अंतरकर यांनी केला आहे.

ही पार्श्वभूमी सांगण्याचे कारण एवढेच की, एक कल्पना मला सुचली. त्या कल्पनेचे पुस्तक होईल का, हे मी आता सांगू शकत नाही. पण निदान आत्ता तरी 'न लिहिलेले पत्र' (अनरिटन लेटर्स) असा एक लेख लिहावा, अशी कल्पना मनात आली आणि म्हणूनच आज ९ ऑक्टोबर या जागतिक टपाल दिनी हा लेह लिहित आहे.

आपण आतापर्यंत 'लिहिलेली पत्रे', 'पाठवलेली पत्रे', 'मिळालेली पत्रे', 'वाचलेली पत्रे', 'न वाचलेली पत्रे', 'न समजलेली पत्रे' असे अनेक प्रकार ऐकले आहेत. या सर्वांमध्ये पत्राचे अस्तित्व आहे, परंतु 'न लिहिलेले पत्र' यात मूलतः 'पत्र अस्तित्वातच नाही', आहे ती केवळ 'पत्र लिहिले नाही' याची मनाला लागून राहिलेली बोचणी.

मनात भावना होती. पत्र लिहिण्याची इच्छा झाली होती; पण पत्र लिहिलेच नाही. माझ्या मते, इच्छा आणि विचार यांमध्ये इच्छा प्रबल होती; परंतु लिहिण्याचा निर्णय विचारांती झालाच नाही. त्यामुळे पत्र लिहिण्याची भावना मनात तशीच राहून गेली आणि तेच मनाला बोचते, टोचते.

आपण पत्र लिहितो, कारण आपल्याला आपल्या मनातील भावना व्यक्त करायच्या असतात. पत्र कुणाला लिहावे याचे काही निश्चित नियम नाहीत, कायदाही नाही आणि कुठलेही बंधन नाही. भावाला, बहिणीला, वडिलांना, आईला, पतीला, पत्नीला, मित्राला, मैत्रिणीला, शिक्षकाला, शिक्षिकेला, वरिष्ठांना किंवा सामाजिक अथवा राजकीय व्यक्तींना, कुणालाही पत्र लिहू शकतो. पत्राची भाषा संदर्भाप्रमाणे व आवश्यकतेनुसार इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराती किंवा अन्य कुठलीही असू शकते.

वास्तविक, पत्र लिहिणे यात 'लिहिणे' अपेक्षित आहे आणि लिहिणे म्हणजे हातात लेखणी घेऊन कागदावर लिहिणे. जे टंकलिखित करून पाठवतो ते 'पत्र' या सदरात खऱ्या अर्थाने मोडत नाही. मग ते डेस्कटॉप संगणकावर असो, लॅपटॉपवर असो किंवा अन्य कुठल्याही इलेक्ट्रॉनिक उपकरणावर तयार केलेले असो.

जेव्हा आपण हाताने लेखणीने लिहितो, तेव्हा आपण लिहिलेली अक्षरे वाचणार्याशी नकळत बोलत असतात. 'बोलत' हा शब्द वाचताच डोळ्यांसमोर ओठांची हालचाल दिसते. अक्षर कितीही सुंदर असो किंवा सर्वसामान्य, प्रत्येक व्यक्तीच्या अक्षरांना एक स्वरूप असते, एक आकार असतो आणि एक ओळख असते.

क्रमशः भाग २: पुन्हा एकदा पत्र लिहूया

मराठी भाषेच्या अभिजाततेचा जागर

बांधिलकीचे तिसरे ऑनलाइन कविसंमेलन उत्साहात

ज्योतिर्मय साहित्य

अमरावती – मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या गौरवपूर्ण पार्श्वभूमीवर बांधिलकी प्रतिष्ठान तसेच बांधिलकी बहुउद्देशीय ट्रस्ट, अमरावती यांच्या वतीने आयोजित '३ रे बांधिलकी ऑनलाइन कविसंमेलन २०२६' नुकतेच गुगल मीटच्या माध्यमातून उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

या ऑनलाइन कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्रा. पुष्पराज गावंडे (युवा कादंबरीकार तथा सुप्रसिद्ध वऱ्हाडी साहित्यिक, अकोला) होते. देवा झिंझाड (सुप्रसिद्ध साहित्यिक तथा प्रकाशक, पेन प्रकाशन, पुणे) यांच्या हस्ते कविसंमेलनाचे उद्घाटन झाले. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. रेखा जगनाळे (सुप्रसिद्ध साहित्यिक, नागपूर) आणि प्रा. महादेव लुळे (सुप्रसिद्ध साहित्यिक तथा अध्यक्ष, बोलीभाषा साहित्य संस्था, अकोला) उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात 'पणती जपून ठेवा, अंधार फार झाला' या भावनेतून मराठी मायबोलीच्या संवर्धनाचा आणि भाषाभिमानाचा संदेश देणाऱ्या ऑनलाइन पणती प्रज्वलनाने झाली. मराठी भाषेची समृद्ध परंपरा, तिचे सांस्कृतिक वैभव आणि बोलीभाषांचे महत्त्व यावर उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हितेश गोमासे यांनी प्रभावीपणे केले. प्रास्ताविक ॲड. नीता प्रफुल्ल कचवे, अध्यक्ष, बांधिलकी प्रतिष्ठान, अमरावती यांनी केले. त्यांनी मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून महाराष्ट्राच्या संस्कृतीची, अस्मितेची आणि भावविश्वाची ओळख असल्याचे सांगत मायबोलीच्या संवर्धनासाठी प्रत्येक मराठी माणसाने योगदान देण्याचे आवाहन केले. स्वागतम् गीत रोशनी कडू यांनी सादर केले, तर आभार राहुल गवस यांनी मानले.

कविसंमेलनात डॉ. राणी चौधरी, योगिता निपाणे, रविन दांडगे, शालिनी कावरे, प्रफुल्ल ठाकरे, कुमुद कोरेडे, माधुरी बाजारे, सुनील लव्हाळे, भगवान कानडे पाटील, रसिका पनके, सुनीता तायडे, स्वाती सेलोकर, घनश्याम सावकर, रोशनी कडू, प्रणाली चव्हाटे, श्रद्धा कोल्हटकर, ॲड. स्मिता बूल, अश्वीनी गहाणकरी, प्रिया सफळे, सुप्रसिद्ध गझलकार विजय वासाडे 'विवा', सुचिता टेमघरे, गजानन डेहनकर, श्रीमती सुलोचना लडवे, शालिनी कावरे, दीपमाला अहिरे, शारदा बरडे आणि उज्वला राहणे आदी निमंत्रित कवींनी आपल्या विविधांगी कवितांचे सादरीकरण करून रसिकांची दाद मिळवली.

मराठी भाषेवरील प्रेम, बोलीभाषांचा गोडवा, सामाजिक जाणिवा, निसर्ग, नातेसंबंध आणि मानवी संवेदनांनी नटलेल्या कवितांनी ऑनलाइन कविसंमेलनाला साहित्यिक उंची प्राप्त करून दिली.

मराठी भाषेचा गौरव, मायबोलीचे संवर्धन आणि नव्या पिढीपर्यंत साहित्याची गोडी पोहोचविण्याचा बांधिलकी प्रतिष्ठानचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

शालेय जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेत स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय मुलीचा संघ विजयी

ज्योतिर्मय साहित्य



जळगाव (गोकुळसिंग राजपूत)- १९ वर्षांखालील वयोगटात अतिम सामना मध्ये डॉ जी डी बेंडळे कनिष्ठ महाविद्यालया चा पराभव करून विजेतेपद पटकावले खेळाडू शामल भावसार, खुशबू चौहान, वैष्णवी सोनार, मोक्षदा चव्हाण, कशीश गोठवल, प्रीती यादव, संस्कृती भावसार, पूर्वा गावडे, आकांक्षा महाजन, मोनिका बोरसे, मारिया, दिव्या मोर, रश्मी बिरहाडे, दुर्वा पाटील, श्रद्धा पाटील, अद्रिका सिंह. या खेळाडू ना मार्गदर्शन -डॉ रणजीत पाटील क्रीडा शिक्षक यांनी मार्गदर्शन केले

महाविद्यालय कडून अभिनंदन : डॉ.श्री. केतन नारखेडे (प्रभारी प्राचार्य एम.जे. स्वायत्त महाविद्यालय) प्रा.श्री.आर. बी.ठाकरे (समन्वयक, के.सी.ई.सोसायटी कनिष्ठ महाविद्यालय),प्रा.सौ.स्वाती बऱ्हाटे (समन्वयक, के.सी.ई. सोसायटी कनिष्ठ महाविद्यालय), प्रा.सौ.राजश्री महाजन (उपप्राचार्य)प्रा.सौ. शिल्पा सरोदे (पर्यवेक्षिका), प्रा. श्री.उमेश पाटील (समन्वयक, कला व वाणिज्य शाखा), प्रा.श्री.गुणवंत वंजारी (समन्वयक, विज्ञान शाखा),प्रा.सौ.वर्षा पाटील (चेअरमन, जिमखाना समिती) खेळाडू चे कौतुक करून पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या.

देशाची, मातृभूमीची व भारतीय तिरंग्याची सेवा करण्याची संधी मला मिळाली हे माझे अहोभाग्य-कमांडो चंद्रकांत त्रिभुवन (से.नि.)

ज्योतिर्मय साहित्य



वैजापूर : ''वैजापूर तालुक्यातील नगिना पिंपळगाव या ग्रामीण भागातील एका गरीब कुटुंबातील तरुणाला देशाची,भारत मातेची, व भारतीय तिरंग्याची सेवा करण्याची संधी मिळणे हे माझं अहोभाग्य होय'', असे गौरव उदगार तालुक्यातील नगिना पिंपळगावचे भूमिपुत्र कमांडो चंद्रकांत दादासाहेब त्रिभुवन यांनी बुधवार (ता,०७) रोजी सेवा पूर्ती सोहळ्यात बोलताना काढले. ते पुढे म्हणाले की, देश व मातृभूमी पेक्षा कोणीही मोठा नाही, त्यांची सेवा ही सर्वश्रेष्ठ सेवा होय. कमांडो चंद्रकांत त्रिभुवन यांनी भारतीय सैन्य दलात कमांडो या पदांवर १७ वर्ष ३ महिने अखंड सेवा केल्यानंतर ते सेवा निवृत्त झाले. त्यांचे मित्र देविदास अनर्थे, प्रभाकर मते, ऋषी वाघ, दिनेश घोलप, साहेबराव पडवळ, आणि अमोल यांनी हा सन्मान व गौरव सोहळा येथील लक्ष्मी नारायण लॅन

मध्ये आयोजित केला होता. या आधी त्यांची शहरातून आई ग,भा, कडुबाई दादासाहेब त्रिभुवन व परिवार सह भव्य मिरवणूक काढण्यात आली.. प्रा.रमेश पा. बोरनारे, यांनीही चंद्रकांत त्रिभुवन यांच्या देश सेवेचा गौरव करतांना त्यांच्या देशसेवेने तालुक्याची शान वाढली असे गौरव उदगार काढले. या प्रसंगी माजी पं.स. सभापती व जिल्हा प्रमुख बाबासाहेब जगताप, नगिना पिंपळगाव चे प्रमुख नानासाहेब गायकवाड, प्रभाकर मते तेसेच जेष्ठ समाजसेवक व सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीराम- सिंह राजपूत, डी. एस. गायकवाड यांनी तसेच सेवा निवृत्त सैनिक संघटनेच्या वतीने सचिव भास्कर चव्हाण व त्यांच्या सर्व फौजीनी त्रिभुवन यांचा शाल ,बुके देऊन गौरव केला.या प्रसंगी प्रा,जवाहर कोठारी,डॉ,संतोष गंगवाल, प्रशांत त्रिभुवन, साहेबराव पडवळ, सिद्धार्थ पडवळ, प्रतीक्षा आहेर, रविंद्र कसबे, कैलास पाटील, आशा जगताप, यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्तविक सूत्र संचलन आणि आभार धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

दिवाळीपूर्वी आनंदाचा शिधा वाटप करा मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे मागणी

ज्योतिर्मय साहित्य



छत्रपती संभाजीनगर (गोकुळसिंग राजपूत)- नाशिक जिल्ह्यात यंदा अल्प पावसामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अनेक भागांत पावसाअभावी खरीप पिकांचे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर मोठा परिणाम झाला आहे. अशा परिस्थितीत आगामी दिवाळी सण गोरगरीब आणि सर्वसामान्य नागरिकांना आनंदात साजरा करता यावा, यासाठी शासनाने दिवाळीपूर्वी रेशन दुकानांमधून 'आनंदाचा शिधा' वितरित करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय गोसावी (बारागाव पिंपरी) यांनी महाराष्ट्राचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे केली आहे.

नाशिक जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये यंदाच्या कमी पावसाचा शेती व्यवसायाला मोठा फटका बसला आहे. पिकांचे अपेक्षित उत्पादन न झाल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून असलेल्या कुटुंबांवर दैनंदिन खर्चाबरोबरच सणासुदीच्या काळातील अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. त्यामुळे शासनाने दिवाळीच्या पार्श्वभूमीवर तातडीने निर्णय घेऊन गरजू कुटुंबांना आनंदाचा शिधा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी गोसावी यांनी केली आहे.

शासनाने दसऱ्यापूर्वी किंवा दिवाळीच्या आधीच रेशन दुकानांवर आनंदाचा शिधा उपलब्ध करून दिल्यास आर्थिक अडचणीत असलेल्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळू शकतो. शिधा किटचे वितरण वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने व्हावे, तसेच जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

आनंदाच्या शिध्यामध्ये देण्यात येणारे रवा, चणाडाळ, साखर आणि खाद्यतेल दर्जेदार असावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. रेशन दुकानांपर्यंत शिधा किट वेळेत पोहोचविण्यात यावेत आणि वितरणाच्या प्रक्रियेत कोणताही विलंब होऊ नये, यासाठी संबंधित विभागाला स्पष्ट सूचना देण्याची गरज असल्याचे दत्तात्रेय गोसावी यांनी म्हटले आहे.

दिवाळी हा सर्वसामान्यांच्या आनंदाचा आणि कुटुंबीयांसोबत सण साजरा करण्याचा उत्सव आहे. मात्र आर्थिक अडचणीमुळे अनेक गरीब व गरजू कुटुंबांना सणाचा आनंद घेणे कठीण होत आहे. अशा कुटुंबांच्या अडचणी लक्षात घेऊन शासनाने मानवतावादी दृष्टिकोनातून तातडीने आनंदाचा शिधा वितरित करण्याचा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकरी, मजूर आणि गोरगरीब कुटुंबांना दिवाळीच्या काळात शासनाच्या मदतीचा आधार मिळावा आणि प्रत्येक कुटुंबाची दिवाळी गोड व्हावी, यासाठी आनंदाचा शिधा तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी दत्तात्रय गोसावी यांनी केली आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

गणेश मंडळांच्या व्यासपीठावर कवितेचा जागर, छत्रपती संभाजीनगर येथे काव्यस्पंदन समूहाच्या माध्यमातून काव्यमैफिलीची यशस्वी हॅटट्रिक

डीजे नाही तर प्रबोधनाचा गजर, शेती, माती, नात्याच्या कवितांनी जिंकली भक्त भाविकांची मने

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) – गणेशोत्सवात देखावे आणि मंडप यासोबत प्रबोधनात्मक विचार पेरले कवीने.छत्रपती संभाजीनगरात यंदा जे घडले ते याचेच उत्तम उदाहरण आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवीसाठी शहरातील सहा गणेश मंडळांनी व्यासपीठ उपलब्ध करून दिले. या संपूर्ण प्रबोधनात्मक क्रांतीची संकल्पना, धुरा आणि अथक परिश्रम आहेत काव्यस्पंदन समूह या पाच कवींच्या समूहाचे. प्रा. डॉ. सुशिल सातपुते, श्री. विजयकुमार पांचाळ, श्री. आर. पी. शिखरे (रोहिदास शिखरे), सौ. सुनिताताई कपाळे आणि श्री. दिपक नागरे या पाच साहित्यिकांनी एकत्र येत काव्यस्पंदन समूह स्थापन केला आणि तीन वर्षांपूर्वी एक ध्यास घेतला – गणपतीच्या मंडपात डीजे वाजण्यापेक्षा विचारांचा गजर झाला पाहिजे. कविता शेतीच्या, मातीच्या, नात्याच्या आणि सामाजिक प्रश्नांची असली पाहिजे. याच संकल्पनेचे वर्ष तिसरे म्हणून या २०२६ मध्ये त्यांनी सलग सहा दिवस शहरात विविध सहा ठिकाणी प्रबोधनाची ज्योत





तेवत ठेवली. सहा दिवसांची काव्ययात्रा पुढीलप्रमाणे संपन्न झाली.

दि. १९/०९ – सिद्धिविनायक गणेश मंडळ, चिकलठाणा

दि. २०/०९ – वक्रतुंड गणेश मंडळ, शिवाजी नगर

दि. २१/०९ – प्रतिक नगरी गणेश महोत्सव, बीड बायपास

दि. २२/०९ – साईनगरी गणेश मंडळ, हिरापूर

दि. २३/०९ – सहयोग गणेश मंडळ, ओंकार नगर

दि. २४/०९ – जय श्रीराम गणेश मंडळ, ओंकार नगर

येथे जेव्हा या कवींनी कविता सादर केल्या तेव्हा केवळ श्रोते नव्हते तर अंतर्मुख झालेले साधक होते.

बरं झालं बाप्पा तू पक्षात नाहीस

पक्षाचं चिन्ह म्हणून कोणाच्या लक्षात नाहीस

म्हणत डॉ. सातपुते यांनी राजकारणाचे विदारक सत्य मांडले.

कवी विजयकुमार पांचाळ यांनी

चंद्रावरील प्रगतीने आपण खुश आहोत

मनाचा विकास कधी होणार आहे

स्त्री अन् पुरुष दोनच जाती

फुलेंचा विचार मनाच्या

गाभाऱ्यात कधी रूजणार आहे

म्हणत यांनी माणुसकीची हाक दिली.

लेकी दोन दिवस

येऊन जा

माहेराला राहून जा..

लेकी तुझ्या विना दार

गेल्यापासून गप्प गार... या ओळीने रोहिदास शिखरे यांनी बाप-लेकीचे नाते जिवंत केले लेकीच्या आठवणीत भक्तांना अश्रू अनावर झाले. यानंतर सुप्रसिद्ध कवयित्री सुनीताताई कपाळे यांनी

भिरभिरे ते पाखरू

पुन्हा माहेरच्या वाटे

नाही दिसत सावली

अश्रू डोळ्यातही दाटे

या कवितेने रसिकांचे हृदय पिळवटून टाकले. यानंतर

आई मी रोबोट नाही

तुझं छोटंसं बाळ गं

बागेतली कोवळी कळी मी

नाही फुलांची माळ गं...या कवितेमधून सुप्रसिद्ध कवी दिपक नागरे यांनी आजच्या शिक्षण पद्धतीवर प्रहार केला.

विद्यार्थी, महिला, शिक्षक, ज्येष्ठ नागरिक सर्वांनी या समूहाचे तोंडभरून कौतुक केले. लोक म्हणत आहेत, ''मोबाईलच्या दुनियेत आम्ही नाती, संवाद आणि माणुसकी हरवत चाललो आहोत. अशा वेळी काव्यस्पंदन समूहच्या माध्यमातून कवी मंडपात येऊन नात्यांना उजाळा देत जिवंत ठेवतात. या कवितेतून सामाजिक भान जपत.. प्रबोधनात्मक विचार या माणसापर्यंत पोहचला जातो.

हा उपक्रम प्रत्येक गणेश मंडळात झाला पाहिजे हीच काळाची गरज आहे. या संकल्पनेला साथ दिल्याबद्दल सिद्धिविनायक मंडळाचे विकास गीते, सतीश मगर, विजयकुमार केकान, शिवहरी दराडे, विजय गुंजाळ, प्रेम ठकारे, अशोक हिवरे, दादासाहेब फल्ले, सुदाम घुगे, सुरेश चव्हाण, प्रकाश मोराळे, सुनील धनवे, सतीश रामटेके, शिव प्रतीक नगरीचे अध्यक्ष डॉ. मारुती गायकवाड, सचिव धनराज गांगवे, बालाजी पदीरवाड, साईनगरीचे राजाभाऊ तांबे, जय श्रीराम आणि सहयोग मंडळाचे पदाधिकारी यांचेही विशेष कौतुक होत आहे. मंडळांचे व्यासपीठ असले तरी विचार प्रबोधनाचा होता आणि या विचारानेच छत्रपती संभाजीनगरच्या गणेशोत्सवाला खऱ्या अर्थाने प्रबोधनाची ओळख मिळवून दिली आहे.

गणेश मंडळाच्या यशस्वी प्रबोधनात्मक काव्यमैफिली नंतर नवरात्र महोत्सवामध्ये प्रबोधनात्मक काव्यमैफिलीची बुकिंग सुरू झाली आहे . त्यासाठी ९१७२४५७७२०, ८८०५६१८१५४, ९४०५७३३११२, ९६६५७०६८७९ या नंबर वर संपर्क करावा.

फेअरी क्विन मधील एक गोष्ट


ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

संधी पाहून तो तिला आश्वस्त करतो. नवीन साहसे करण्यासाठी तिच्यापासून दूर गेल्याचे सांगतो. तो दुष्ट आरकीमागो (स्वत:) चा शोध घेत असल्याचे ही सांगतो.

त्याच्या मधाळ बोलण्याने ती सर्व त्रास विसरुन आनंदी होते. आरकीमागोला यश मिळत आहे असे वाटते म्हणून आनंद होतो. थोड्याच अंतरावर त्यांना त्यांच्याकडे येत असलेला दुसरा योद्धा (सॅन्झलॉय) दिसतो. त्याच्या मनात सॅन्झफॉयला मारल्यामुळे रेडक्रॉस योद्धयाचा सूड घ्यायचा असतो. ऊना रेडक्रॉस योद्धा समजून आरकीमागोचा उत्साह वाढवते. दोघांच्यात (आरकीमागो व सेन्झलॉय) युद्ध होते. जोराच्या हल्ल्यात आरकीमागो जखमी होतो. ऊना पराभूत झालेल्यास दया दाखविण्यास सांगते. त्याआधी तो सत्यवचनी योद्धा असल्याची आठवण करुन देते.

शिरस्त्राण दूर केल्यावर सॅन्झलॉय म्हाताऱ्या मित्राला म्हणजे आरकीमागोला ओळखतो. तो जादूटोणा करणारा असल्याचे त्याला माहित असते. आता ऊना मोठ्या संकटात सापडते. सॅन्झलॉयच्या तावडीतून ती जाऊ शकत नाही. तो तिला घोड्यावरुन खाली खेचतो. त्याबरोबर सिंह



त्याच्यावर हल्ला करतो. परंतू सॅन्झलॉयच सिंहाला ठार मारतो.



ऊना चे संरक्षण करण्यास कुणी नसते. तो जंगली जेता व ती असहाय अशी स्थिती असते. ती निराश होते. तिला घेऊन तो पुढे निघतो. तिची तक्रार, रडण्याचा उपयोग होत नाही. तिचा कमी ऊंचीचा साधा घोडा मात्र तिच्या मागोमाग येत रहातो. पुढे काय घडले ते जाणण्याची उत्कंठा वाटते. त्यासाठी फेअरी क्विन वाचावी लागेल.

पुढच्या पीढीचा विकास समाज, शिक्षकांच्या हाती ?

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

त्या ज्ञानाच्या जोरावर विद्यार्थी खाच खळगे व्यवस्थित ओळखून सुकरमार्ग काढण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यावेळी त्याला शिक्षकाबद्दल श्रद्धा, भक्ती , विश्वास , आपुलकी जागृत असते. त्यांची जीवनभर आठवण त्याला तेवत पणे प्रकाश देत असते. पालका नी ही त्या विद्यार्थ्याची मानसिकता जपून ठेवण्यास सहकार्य केले पाहिजे- पण आज काळच्या विज्ञान युगात हेचित्र अभावानेच दिसते. त्याचा परिणाम विद्यार्याच्या मनावर होवून विद्यार्थीही बिथरले आहेत. सत्य काय आहे ह्याचाच विसर त्याना पडल्याचे चित्र आहे


स्वामी विवेकानंद, रविद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, विनोबा भावे, राजर्षी शाहू महाराज, वि.दा. सावरकर, डॉ. अब्दुल कलाम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतीबा फुले, क्राँ ती ज्योत सावित्रीबाई फुले, महर्षि केशव धोंडे कर्वे, इत्यादी महान पुरुषांचे सुविचार मात्र ह्या मुळा पर्यंत पोंचत नाहीत. त्यामुळे वास्तव काय आहे ह्या पेचात ते कायम बुडालेले असतात वास्तविक शिक्षकांच्या अभ्यासातून त्यांच्या चितंना तून, कृतीतून हे विद्यार्थ्या पर्यंत पोहचणे आवश्यक आहे. सर्व प्रकाराचे संवाद वाढविणे गरजेचे आहे. सहकार्याची टाळी वाजली पाहिजे ह्याचे भान समाजानेही राखणे काळाची गरज आहे , पण समाज सध्याकाय करतो हे आपण पाहतो आहोत. मग शिक्षका कडे अंगुलीनिर्देश करण्यात काय अर्थ आहे. अन् मुले बिघडली आहेत, शिक्षणाचे काही खरे नाही , शिक्षक शाळेत रहात नाहीत दीन जाव पैसा आव अशी वृत्ती शिक्षकांची झाली आहे असे म्हणून त्यांच्यावर खापर फोडणे कितपत योग्य आहे? शासनही शिक्षकांच्या माथी अनेक इतर कामाचा भार टाकून त्यांना एक प्रकारे मुलांना शिक्षण देण्यापासून दूरच ठेवते आहे शिवाय श्रीमंत लोक आपल्या पैश्याच्या जोरावर, गरीब आपल्या पोटा पाण्याच्या विवंचनेत, मध्यमवर्ग स्व विका सात, भोग भोगण्यात गर्क आहे, परस्पर सुसंवाद साधावा असे मनातून वाटत नाही मुळे त्यामुळे वैचारिक सैरभैर झाले आहेत. समस्या वाढतच आहेत, गाडी सुटल्यावर जाग येत आहे. मग विचार करण्याची पाळी येते तेव्हा अंधाराचे सावट पसरलेले असते कारण वेळ कोणा साठी थांबत नसतो. कोणालाही ह्यापासून समाधान मिळत नाही. ताण वृद्धिंगत होतो कारण आदर हा शब्द मुलांच्या मनातून कालबाह्य होतो आहे मग सांगा शिक्षक हयाला जवाबदार कसे? समाजाचे सर्व घटकच ह्याला जबाबदार आहेत अस मलाही वाटत त्यासाठी चिंतंन करण्याची गरज आहे.

ह्या वर्तमानाची टोचणी वृद्धा ना प्रकर्षाने होत असते पण म्हणून ज्येष्ठा नी गप्प बसणे समाज उन्नती च्या दृष्टीने घातक आहे. शिवाय कृत्रीम बुद्धिमत्तेचा अभ्यास सराव डोक्यावर ओझे आणखी होत आहे त्यामुळे नको त्या गोष्टी विद्यार्थ्यांच्या माहिती मध्ये असकारात्मक भरच घालत असतात. ज्येष्ठांनी न्यूनगंड सोडून ह्या सामाजिक प्रश्नाची उकल करून शिक्षका ना मदत करून त्यांच्या पंखात बळ भरले पाहिजे. ज्या योगे ते शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची चांगली विकसीन शील पीढी घडवू शकतील.



समाजानी स्वत:लाही एक प्रश्न विचारला पाहिजे की मी संस्कारीत मूल्यांची जपवणूक करतो काय? त्याचा अंगीकार करून समाजात वावरतो काय? आपल्या नित्य दिनचर्येतून समाज कार्याला वेळ देतो काय? आपल्याच मुलांना आपण आपल्या आचरणातून शिस्त लावतो काय? त्यांच्या वागण्यावर , बोलण्यावर नियंत्रण ठेवू शकतो काय? मी , नाते आणि शेजार धर्माचे पालन चोख पणे करतो काय? अशा प्रकारचे प्रश्नाचे वर्तमानात नकारार्थी उत्तर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून ह्याचे सकारात्मक उत्तर आपल्याच हातात आहे. पण त्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे आणि मग शिक्षक आपल्या मुलांना शिक्षण देण्यात मागे राहणार नाहीत. केवळ एक घटक ह्याला जिम्मेदार आहे असे होवू शकत नाही .सबके साथ सबका विकास ह्याची कास धरून प्रगतीची शिखरे गाठणे शक्य नाही काय? अर्थात शिक्षकानी देखील आत्मपरिक्षण करण्याची रास्त गरज आहे. नवीन ज्ञान आत्मसात करून विद्यार्थ्या पर्यंत पोंहचविण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. संस्काराचे महत्व पटवून देण्यासाठी मूल्यशिक्षणाचा विचार जागृत ठेवला पाहिजे.

ह्या सकारात्मक विचारांचा समाजाने, शिक्षकांनी, पालकानी, शासन कर्त्या ने, शासकीय यंत्रनेने आत्मपरिक्षण करून पुढचे पाऊल उचलले पाहिजे तरच आपल्याला अभिप्रेत पुढच्या पिढीचा विकास होईल , राष्ट्र प्रगत होईल, आणि खरे समाधान मिळेल. नसता सोनाराने फुंकले कान इकडे तिकडे गेले भान असे होईल आणि मग त्यात धनीही सुखी नाही अन राजाही सुखी नाही अशी गती होईल . इतकेच !



कुटुंबप्रमुख हवा आहे!- भाग ६ : आपण भारतीय आहोत, हे कसं सिद्ध करणार?

ज्योतिर्मय साहित्य

''आपण भारतीय आहोत, हे कसं सिद्ध करणार?'' श्रीरामच्या या प्रश्नाने कृष्णकांत काही क्षण स्तब्ध झाला. त्याला वाटलं, आता मामा आजोबा कदाचित एखादा कठीण धडा सांगतील, पण माधव मामा शांतपणे म्हणाले,

''सिद्ध करण्यासाठी नेहमी कागदपत्रांची गरज नसते. काही गोष्टी आपल्या वागण्यातून सिद्ध होतात.''

''म्हणजे?'' श्रीरामने विचारलं.

''तुला भूक लागली आणि तुझ्या बहिणीलाही आधी भूक लागली असेल, तर तू काय करशील?''

''तिला आधी खायला देईन.''

''का?''

श्रीराम काही क्षण विचार करू लागला.

''कारण ती माझी बहीण आहे.''

''ही झाली पहिली खूण, आपलेपणा.''

मामा आजोबा पुढे म्हणाले, ''तुझ्या घरात काम करणाऱ्या माणसाशी तू कसा वागशील?''

''चांगलं वागेन.''

''का?''

''तोही माणूस आहे.''

मामा आजोबा हसले.

''ही दुसरी खूण, माणुसकी.''

श्रुतकीर्ती मध्येच म्हणाली, ''मामा आजोबा, कुणी चूक केली तर?''

''त्याला लगेच वाईट माणूस म्हणायचं नाही. आधी त्याची चूक समजून घ्यायची आणि शक्य असेल तर त्याला सुधारायला मदत करायची.''

''हे भारतीय आहे?''

''हो. पण फक्त भारतीयच नाही. हे माणूसपणही आहे. भारताने मात्र या विचारांना हजारो वर्षे आपल्या जीवनपद्धतीत स्थान दिलं.''

श्रीराम आता अधिक उत्सुक झाला. ''मग भारताचं वैशिष्ट्य काय?''

मामा आजोबांनी टेबलावर ठेवलेला भारताचा नकाशा उघडला.

''या देशात अनेक भाषा आहेत, अनेक धर्म आहेत, अनेक पंथ आहेत, अनेक देवतांची उपासना आहे, वेगवेगळे पोशाख, भोजनपद्धती, सण आणि परंपरा आहेत. तरीही 'विविधतेत एकता' ही कल्पना भारताच्या संस्कृतीत खोलवर रुजलेली आहे.''

''म्हणजे सगळ्यांनी सारखं व्हायचं नाही?''



''अगदी नाही. वेगळे राहूनही एकमेकांचा आदर करणे, ही भारतीय संस्कृतीची मोठी शिकवण आहे.''

मामी आजीने हळूच विचारलं,

''मग आपल्या संस्कारांची सुरुवात कुठून करायची?''

माधव मामा म्हणाले,

''मनापासून.''

ते श्रीरामकडे वळले.

''म्हणूनच काल मी तुला समर्थ रामदासस्वामींच्या मनाच्या श्लोकातील ओव्या सांगितल्या. मनावर संस्कार झाले, तर वर्तनावर होतात; वर्तन बदललं, तर व्यक्तिमत्त्व घडतं.''

''मग समर्थ रामदासस्वामींबद्दल मला सगळं सांगणार ना?''

''नक्की. आणि त्यानंतर तुला छत्रपती शिवाजी महाराजांविषयीही सांगायचं आहे.''

श्रुतकीर्तीने लगेच हात वर केला. ''आणि संत तुकाराम?'' मामा आजोबा मोठ्याने हसले.

''तुझीही तयारी दिसते आहे! त्यांच्याबद्दलही सांगू.'' कृष्णकांत आणि पामेला एकमेकांकडे पाहून हसले.

त्या रात्री श्रीराम बराच वेळ विचार करत होता. भारतीय असणे म्हणजे नेमके काय? त्याला अजून पूर्ण उत्तर मिळाले नव्हते, पण एक गोष्ट त्याला समजू लागली होती. भारतीयत्व रक्तात नसतं; ते विचारांत, संस्कारांत आणि आचरणात जपावं लागतं.

क्रमशः भाग ७ : मनावर संस्कार

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559